# संपादकीय

**लोकप्रिय कथाकथनकार व.पु.काळे**

'ग्रंथजगत' ने यापूर्वी वि.स. खांडेकर, रणजित देसाई, आनंद यादव यांच्यावरचे विशेषांक काढलेले होते. या वेळी मराठीतील एक लोकप्रिय कथाकार व कथाकथनकार वसंत पुरुषोत्तम काळे यांच्यावरील हा अंक सादर करण्यात येत आहे व.पु. काळे यांची गेल्या आठ-दहा वर्षात मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे पुस्तके प्रसिद्ध होऊ लागली आहेत आणि त्यांच्या अनेक आवृत्त्या निघालेल्या आहेत. वपुंच्या कथालेखनाला १९६० नंतर बहर आला; 'लोंबकळणारी माणसे', 'पेन सलामत तो' हे त्यांचे संग्रह १९६०-६३ च्या दरम्यान निघाले. त्यांच्या कथा-निवेदनातील अनौपचारिक खेळकरपणा, वाचकाशी संवाद साधण्याची त्यांची हातोटी, त्यांच्या कल्पकतेमुळे कथावस्तूत येणाऱ्या फँटसीवजा भराऱ्या, मुंबईच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या कथांमध्ये येणाऱ्या बहुढंगी व बहुरंगी व्यक्तिरेखा, कथेची रंगत सतत वाढत जाईल अशा प्रकारची प्रसंगांची मालिका पेश करण्यातील चतुराई, मानवी स्वभावातील गुंतागुंतीचे आणि समस्यांचे त्यांचे आकलन, त्यांच्या कथेत नेहमी आढळणारी नियतीने माणसाच्या सुखाला तडे जात राहण्याची केलेली योजना अशा अनेक बाबींमुळे वपुंच्या कथा वाचकांना रंजक वाटत राहिल्या. त्यातील मानवी मनाच्या क्रीडा स्तिमित करीत राहिल्या. त्यांच्यातील माणुसकीची दर्शने वाचकाच्या सत्प्रवृत्तींना आवाहन करीत राहिली. वपुही आपल्या बहुहुन्नरी प्रतिभेवर त्या काळात खूष होते आणि वेगवेगळ्या प्रकारे आपल्या आकर्षणाच्या कक्षा वाढवत होते.

१९७० नंतर व.पु. काळे यांना आपल्या लेखनशक्तीबरोबर आपल्या कथाकथन कौशल्याचीही जाणीव झाली आणि ते कथाकथनाचे कार्यक्रम करू लागले. महाबळेश्वरला त्यावर्षी झालेल्या विभागीय साहित्य संमेलनातील वपुंचे कथाकथन श्रोत्यांची अपूर्व दाद मिळवणारे ठरले आणि नंतर या कथाकथनाच्या उपक्रमाला त्यांनी घासूनपुसून अत्यंत आकर्षक अशा अडीच तीन तासांच्या कार्यक्रमाचे रूप दिले. महाराष्ट्रभर त्यांचे कथाकथनाचे दौरे सुरू झाले. त्यांच्या पाठोपाठ इतरही कथाकथनाचे प्रयोग करू लागले आणि व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, काव्यवाचन या बरोबर जागोजाग कथाकथनांनाही गर्दी होऊ लागली. 'ककची क' (कथाकथनाची कथा) या पुस्तकात त्यांनी कथाकथनाच्या आपल्या कार्यक्रमांची



कहाणी सांगितलेली आहे. कथाकथनाचे तंत्र, श्रोतृवर्गाची मानसिकता, कार्यक्रम आयोजकांचे अनुभव वगैरे बाबींवर त्यांनी प्रकाश टाकला आहे. श्रोतृवर्गाला पहिल्या एक-दोन मिनिटातच कब्जात घेण्याची सिद्धी प्राप्त झाली तरच कार्यक्रम रंगतदार होतो हे त्यांच्या लक्षात आले आणि जाणीवपूर्वक त्यांनी आपले कथाकथनाचे तंत्र विकसित केले. कथाकथनामुळे अनेक क्षेत्रातील दिलदार चोखंदळ चाहते त्यांना लाभले. अनेक वाचक त्यांना आपल्या सुखदुःखात सामील करून घेऊ लागले. गावोगाव वपुंच्या भक्तांची संख्या वाढू लागली. पुढे वपुंच्या कथाकथनाच्या ध्वनिफिती (कॅसेट्सही) निघाल्या. त्यामुळेही त्यांची लोकप्रियता वाढत राहिली. कथाकथनाच्या कार्यक्रमांमुळे वपुंच्या व्यक्तिमत्त्वालाही एक वेगळी झळाळी प्राप्त झाली. मराठी मध्यमवर्गीय माणसाचे एक प्रातिनिधिक व रसिक रूप म्हणून त्यांची प्रतिमा जनमानसात स्थिरावत गेली आणि त्यांच्या कौतुकालाही उधाण आले. वपुंच्या कथालेखनावर कथाकथनकाराने आपली पकड बसवली आणि त्यांच्या कथाही कथाकथनकाराच्या रंगढंगाने समोर येऊ लागल्या. त्यांचे लेखही प्रकट चिंतनाच्या स्वरूपात लिहिले जाऊ लागले. त्यांच्या सर्वच लेखनात एक प्रकारचा प्रांजलपणा आणि अनौपचारिकपणा आहे. मोकळेपणा आहे. वाचकाशी संवाद साधण्याची तळमळ त्यामागे आहे. त्यातूनही वाचकवर्ग त्यांच्या अधिक निकट येत गेला. वपु स्वतः जणू फक्त आपल्याशीच मोकळेपणाने गप्पा मारीत आहेत, हितगुज करीत आहेत, आपल्या मनातले मर्मबंधाचे खजिने खुले करीत आहेत, असे प्रत्येक वाचकाला वाटू लागले. त्यामुळे वपु हा खास आपला माणूस, असा विश्वास त्याला वाटू लागला. वपुंना ही वाढती जबाबदारी अनेकदा मनःस्ताप देणारीही ठरली असणार! परंतु त्यांनी ती दीर्घकाळ नेटाने निभावून नेली हे खरे!

ब्रेन ट्युमर झालेल्या प्रिय पत्नीच्या मृत्यूने वपुंच्या भावविश्वाला मोठाच हादरा बसला आणि त्यातून सावरण्यासाठी त्यांना फार मोठे मानसिक बळ जमवावे लागले. एक प्रकारचा वैराग्य-विरक्तीचा भाव त्यांच्या मनाचा कब्जा घेऊ लागला. लेखन, कथाकथन कार्यक्रम यातील त्यांचा उत्साह त्यामुळे मंदावू लागला. ओशो रजनीशांच्या गीतेवरील ध्वनिफितींनी त्यांना या विरक्तीतून थोडेफार बाहेर काढले. 'आपण सारे अर्जुन' या लेखमालेद्वारे वपुंनी नव्या उमेदीने 'सामना'मध्ये सदर लेखन सुरू केले. त्या सदरातील लेखांचे पुस्तकही मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रसिद्ध केले. दोन वर्षात त्याच्या चार आवृत्त्या निघाल्या. परंतु हे सदर दीर्घकाळ लिहिण्याची कल्पना मात्र मागे पडली. खरे तर वपुंनी लिहित राहायला हवे, तोच त्यांना विरंगुळा ठरेल. त्यांच्या विरक्तीच्या भावनेवरचा उतारा ठरेल.

व.पु. काळे हे नाव मराठीतील आजच्या लोकप्रिय लेखकांमध्ये पहिल्या काही क्रमांकात आहे. पुस्तकांच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या निघत आहेत. 'वपुर्झा' (तेरावी आवृत्ती),

‘पार्टनर’ (दहावी आवृत्ती), ‘घर हरवलेली माणसं’ (सातवी आवृत्ती), ‘ही वाट एकटीची’ (आठवी आवृत्ती), ‘ऐक सखे’ (सहावी आवृत्ती), ‘वन फॉर दि रोड’ (पाचवी आवृत्ती), ‘भुलभुलैया’ (चौथी), ‘काही खरं काही खोटं’ (चौथी आवृत्ती), ‘चिअर्स’ (चौथी), ‘सांगे वडिलांची कीर्ती’ (चौथी), ‘माणसे’ (तिसरी), ‘वपु ८५’ (तिसरी), ‘महोत्सव’ (तिसरी) इत्यादींचा उदाहरणादाखल उल्लेख करता येईल. मराठीत लोकप्रिय लेखक म्हटले की काही विद्यापीठीय समीक्षक त्याकडे ढुंकूनही पाहायला तयार होत नाहीत. त्यामुळे वाचकांची आवड व अभिरूची एकीकडे आणि विद्यापीठीय समीक्षकांचे तोंड दुसरीकडे असे दृश्य दिसते. खरे तर मराठी माणसांमधील साहित्याची आवड जोपासण्याचे काम असे लोकप्रिय लेखकच करीत असतात आणि त्यामुळे मराठी साहित्यसृष्टीतले चैतन्य बहरलेले दिसते.

व.पु. काळे यांच्या लेखनाला नव्याने बहर येवो.

**स्वागत**

‘इंडिया टुडे’ साप्ताहिकाचे प्रकाशन करणाऱ्या लिव्हिंग मिडिया इंडिया लिमिटेड या संस्थेने इंडिया टुडे बुक क्लब सुरू केला असून त्याद्वारे इंग्लिश पुस्तके सवलतीत मिळण्याची व्यवस्था केली आहे. बुक्स टुडे या नावाचे त्रैमासिकही त्याची माहिती देण्यासाठी काढण्यात आले आहे. त्याच्या संपादकीयात म्हटले आहे, ‘‘वाचकाला आपल्या आवडीचे पुस्तक काहीही यातायात न करता सहजपणे, त्वरेने आणि परवडेल अशा किंमतीत मिळावे हाच या बुक क्लबचा उद्देश आहे. प्रकाशन व्यवसाय सध्या वैयक्तिक ग्राहकापेक्षा संस्थात्मक ग्राहकावर भर देत आहे; त्यामुळे त्याच्या उत्पन्नाला खूपच मर्यादा पडत आहेत. जुनी खपाऊ पुस्तके काढण्याकडे प्रकाशकांचा कल जास्त दिसतो. वाचकांची अभिरूची लक्षात घेऊन, समकालीन संदर्भ असणारी पुस्तके काढण्याबाबत प्रकाशक निरुत्साही दिसतात. अनेक प्रकाशकांना वाचक-ग्राहकांच्या मागणीच्या गुंतागुंतीच्या व्यवहाराचीही पुरेशी माहिती नसते. वाचक व पुस्तक यांच्यावरील ही दरी भरून काढण्यासाठी आणि या सर्व समस्यांवर तोडगा म्हणून वाचकांना आपल्या आवडीची पुस्तके घरबसल्या झटपट मिळू शकतील. कोणाही ग्रंथ रसिकाला आपले स्वप्नच प्रत्यक्षात आल्याचा आनंद त्यामुळे होईल.’

या क्लबचा व्याप अर्थात फक्त इंग्रजी पुस्तके, कॅसेट्स, सीडी-रॉम यापुरता मर्यादित आहे. मराठीतही असा व्यापक उपक्रम होण्याची गरज आहे.

- संपादक

# सरस्वतीच्या सतारीचे बोल सध्या लेखणीच्या टोकावर येत नाहीत

## व. पु. काळे

श्री. शंकर सारडा त्यांच्याकडून फोन आला. स्वतःच्या साहित्यनिर्मितीबाबत मी काहीतरी लिहावं, ही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. हेच मी आत्तापर्यंत टाळत आलो.

मोराला स्वतःच्या पिसाऱ्याबद्दल 'तू काहीतरी सांग' किंवा 'उंचावर पंख न हलवता तू आकाशात, वाऱ्याच्या लाटेवर संथपणे विहार कशी करू शकतेस?' असं घारीला विचारलं तर मोर किंवा घार काय सांगू शकेल?

तसंच लेखनाचं.

कथानक सुचलं म्हणजे घारीसारखी झडप घालायची आणि मोरासारखा पिसारा फुलवून कथानक रंगवायचं. एवढंच मी करीत आलो.

मी?

म्हणजे नक्की कोण?

गाणं शिकणारा ठरवून गाणं शकतो. गुरू किंवा 'सो कॉल्ड' घराणं निवडतो. तेच डान्स शिकायचा असेल तर. चित्रकला, शिल्पकला ह्यांच्या बाबतीत तेच. म्हणून त्यांचे क्लासेस चालतात. 'स्कूल ऑफ आर्ट' सारखी संस्था, आज दिमाखात उभी आहे. शंभर वर्षे सहज झाली असतील.

घराणी निर्माण होत नाहीत ती फक्त लेखन आणि काव्याच्या प्रातांत! हरी नारायण आपटे, वामन मल्हार जोशींपासून ना.सी. फडके, वि. स. खांडेकर, दत्त रघुनाथ कवठेकर, चिं.वि. जोशी, महादेवशास्त्री जोशी, जी. ए. कुलकर्णी, दि.बा.मोकाशी, श्री.ना. पेंडसे असे नामवंत लेखक जन्माला आले. या सगळ्यांच्या यादीत, आठवड्याला एक कथा सातत्यानं लिहिणाऱ्या अंबादास अग्निहोत्रीयाचं स्मरणही कुणाला उरलं नाही. वि.वि. बोकील, ग.ल. ठोकळ यांचं हेच होत गेलं.

लेखक समानकालीनांसाठीच लिहितो हे सत्य. मग कुणाचं साहित्य चिरकाल टिकतं? चिरकाल म्हणजे अतिशयोक्ती झाली. भगवद्गीतेलाच ते बिरुद बहाल करायचं. आता ह्याचं कारण काय असेल? भगवद्गीतेतलं प्रत्येक विधान अंतर्दिशेच्या मार्गानं जातं, ज्या मूळ



वृत्तींसकट, षड्रिपूंसहित माणूस जन्माला येतो. त्यांनाच व्यासांनी हात घातला. षड्रिपू आणि माणूस ह्यांची फारकतच करता येणार. म्हणूनच ज्या ज्या लेखकांनी अंतर्मनाचा प्रवास ज्या प्रमाणात केला, त्या त्या प्रमाणात त्यांचं लेखन टिकून आहे.

कालचं वर्तमानपत्र आज शिळं का होतं? मुळातच त्यात परवाच्या घटना असतात. खून असो वा दरोडा किंवा अपघात, त्याचप्रमाणे राजकीय नेत्यांच्या हालचाली याचं टिपण आपण दुसऱ्या दिवशी वाचतो. त्या बातम्याही वस्तुनिष्ठ नसून व्यक्तिनिष्ठ असतात. अपघातात मरण पावलेल्यांचे आकडे सुद्धा प्रत्येक पेपरमधे वेगवेगळे असतात.

ते लेखन अल्पायुषी का ठरणार नाही? तरीसुद्धा माणसानं लेखन करावं. जमेल तसं करावं. प्रत्येक माणूस म्हणजे एकेक ग्रंथ असतो. ह्याच दृष्टिकोनातून मी मागे लिहिलं होतं, कोणतीही प्रेतयात्रा पहाताना, एक भला मोठा ग्रंथ चार माणसं जाळायला नेत आहेत असं मला वाटतं. अक्षरओळख झालेली माणसं लिहिती झाली तर केवढी ग्रंथसंपदा, चरित्ररूपानं निर्माण होईल, विचार करा.

मग माणसं बुजतात का?

प्रथितयश लेखकांचं लेखन वाचतात, अवाक होतात आणि 'हा आपला प्रांत नाही' असं म्हणून थांबतात. मित्रांना सांगतात, 'मला हेच म्हणायचं होतं.'

अरे बाबा, मग का म्हणाला नाहीस?

प्रख्यात तत्त्वज्ञ इमर्सन म्हणतो : ह्या क्षणी लिहा. तसं केलं नाहीत, तर दुसरा कुणीतरी ते अगोदरच लिहून टाकील. आणि ते वाचताना तुम्हाला नंतर वाटेल, 'मी हे आणखीन

जास्त सरस लिहू शकलो असतो.'

अंतरीचा उमाळा आणि अनुभवातली सच्चाई ह्या दोन गोष्टी असतील तर लेखन उतरतं. ते लिहावंही लागत नाही. माझं लेखन वाचून जी अनोळखी माणसं, परिचय करून घेण्याच्या हेतूनं येतात, त्यापैकी साठ ते सत्तर टक्के वाचक सुरेख बोलतात. नेमकं बोलतात. पतिपत्नीसंबंधाबद्दलही मोकळेपणानं बोलतात. 'प्लेझर बॉक्स' पुस्तकाचा निर्माता मी एकटा आहे का? ह्याच पुस्तकाचा प्रकाशन समारंभ मी पुण्यात केला. १९६२ सालापासून 'मेनका प्रकाशन'चे पु.वि.बेहरे हे संपादक आणि प्रकाशक, माझे मित्र. मेळावे, संमेलनं ह्यापासून अंतरावर राहणारे. भिडस्त. अबोल गृहस्थ. प्रा. राम शेवाळकरांच्या हस्ते मी त्यांचा सत्कार केला. योग असा की 'प्लेझर बॉक्स' हे माझं पन्नासावं पुस्तक. त्यावेळी शेवाळकरांनी एका वाक्यात, एका विधानानं माझा गौरव केला होता. ते म्हणाले होते,

''प्लेझर बॉक्सच्या निमित्तानं, वाचकांच्यात लपलेले, प्रकाशात न आलेले अनेक लेखक, ह्या पुस्तकामुळे प्रकट झाले. हे एक प्रकारचं सामाजिक कार्य वपुंनी केलं.''

प्रा. शेवाळकरांचे हे बोल आजही सार्थ ठरत आहेत. आजही मला दिवसाला सात-आठ पत्रं येतात. पण आता मी थकलो आहे. संसारातल्या कटकटी, संघर्ष वाढत्या प्रमाणात आहेत. वीस-वीस वर्षं संसार करणारी माणसं घटस्फोटाच्या रांगेत आहेत.

स्त्री वा पुरुष, म्हणजेच पतिपत्नी, त्याहीपेक्षा आपण माणसं, 'HUMAN BEING' म्हणा, विकृतीच्या कोणत्या टोकापर्यंत जाऊ शकतो, ह्याची किमान वीस-पंचवीस उदाहरणं माझ्यासमोर आहेत. काही संसार अतिसमृद्धीपायी फासावर गेले आहेत. घटस्फोटाच्या केसेस चालवणारे फॅमिली कोर्टचे जज्ज पी.एल. जोशी माझे मित्र. मी अधूनमधून त्यांना भेटण्यासाठी फॅमिली कोर्टात जातो. माणसांचे वेगळे नमुने पहायला मिळावेत म्हणून आणि खरं सांगतो, मन दुभंगून गेलं. कोर्टात जे विकृत नमुने पाह्यले, त्यावर जर कथा लिहिल्या तर, 'सध्या नवीन काय?' असं विचारणारे वाचकच मला सत्तरीच्या घरात गेलेल्या वपुंना आता म्हातारचळ लागला आहे, त्यांनी आता लेखन थांबवावं'' असं म्हणतील, त्यापूर्वीच मी थांबलो आहे. माणसांवर उदंड प्रेम करणाऱ्या वपुंचा पराभव माणसांनीच केला आहे. बत्तीस कथासंग्रहातून आणि 'पार्टनर' सारख्या कादंबरीतून मी जे लिहिलं ते 'माणूस' ह्या प्राण्याबद्दलंच लिहिलं का? असा संभ्रम आता मला पडला आहे.

'नेति, नेति' हेच सत्य.

प्रत्येक माणूस त्या चैतन्याचं रूप आहे. मी पण त्यात आलोच. पण तो पूर्णत्वाचा अंश आहे. समोरचा माणूस पूर्ण वर्तुळ आहे. अंश वर्तुळाला पूर्णत्वानं कसा जाणू शकेल? ह्याचीच जाणीव झाल्यामुळे मी एक पराभूत ठरलेला लेखक आहे. ज्यांना माझं लेखन आवडलं, तेवढ्यापुरते चैतन्याचे अंश एकजीव झाले असं मानायचं, नव्हे मानतो.



पुढे लेखन होणार आहे की नाही, माहीत नाही. सरस्वतीच्या सतारीचे, चैतन्याचे 'दिड्दा,दिड्दा' बोल सध्या लेखणीच्या टोकाशी येत नाहीत, हे ह्या क्षणीचं सत्य. □

***सत्यनिष्ठ इतिहासप्रेमी वाचक, अभ्यासक, ग्रंथालये, संस्था, विद्यमान व भावी इतिहास संशोधकांनाही सर्वोपयुक्त संदर्भग्रंथ***

**भारतीय राजवंश : एक सत्य संशोधन : खंड १ ला**

***(कदंब, महापद्म नंद, सात वाहन, वाकाटक : राजवंश) :***

**संशोधक : अभ्यासक : लेखक :**

**प्रा. रामकृष्ण आनंदराव कदम,** एम.ए.

*इतिहासतज्ज्ञांनी, परिषदांनी, संस्थांनी वाखाणलेली; नामवंत विचारवंत, कुलगुरू, लेखक, संशोधक, अभ्यासक व प्राध्यापकांनी ३२ अभिप्राय देऊन गौरविलेली सुवर्ण पुष्पे ! चुकीचे सिद्धांत गृहीत धरून केलेल्या इतिहास-लेखन पार्श्वभूमीवर क्षात्र-राजकुल-मूलत्व संशोधन करून मांडलेले वास्तव चित्र!*

**आकर्षक रंगीत मुखपृष्ठ, पुठ्ठा बांधणी, पृष्ठे डेमी-३००**

**मूल्य रु. २००/- (विस्तृत विषयसूची, परिशिष्टे, नकाशे इ. सह) :**

**● प्रती मर्यादित / आजच मागणी करा / लिहा. ●**

**प्रकाशक :** ***बा. ग. पवार*** 'मातृभूमि' प्रकाशन, पुणे- २९. फोन. ३६००३७
**पत्ता :** 'वंदेमातरम्' भारती नगर, पौड मार्ग, शुभारंभ मंगल कार्यालयासमोर, पुणे २९. पिन : ४११०३७.

**ग्रंथप्रेमींसाठी खुषखबर !**

आपल्यासाठी आम्ही एक आकर्षक सवलत योजना जाहीर करीत आहोत. आपण मे ९९ पासून १० महिने दरमहा १०० रु. ची मनीऑर्डर पाठवा. मार्च २००० मध्ये १५०० रुपयांची आपल्या पसंतीची पुस्तके आम्ही आमच्या खर्चाने पाठवू. त्वरा करा.

**या योजनेचे सभासद व्हा व दर्जेदार पुस्तके घरपोच मिळवा.**

**आमचा पत्ता :** मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६ सदाशिव पेठ, पुणे ३०

# साहित्यवार्ता

## लॉस एंजेलिसच्या ग्रंथमहोत्सवात चार भारतीय लेखक

लॉस एंजेलिस टाइम्स या दैनिकाने तेथील विश्वविद्यालयाच्या प्रांगणात वार्षिक ग्रंथमहोत्सव साजरा केला; त्यासाठी शंभर साहित्यिकांना निमंत्रण दिले होते. त्यात चार भारतीय लेखकांचाही समावेश होता हे विशेष!

अमेरिकेत 'न्यू एज गुरू' म्हणून ख्यातिप्राप्त दीपक चोप्रा याने सर्वंकष आरोग्यसाधनेचे तंत्र विशद करणारी जी पुस्तके लिहिली ती तेथे बेस्ट सेलर्सच्या यादीत दीर्घकाळ गाजत आहेत.

चित्रा बॅनर्जी दिवाकरुणी या लेखिकेने ॲरेंजड् मॅरेज आणि मिस्ट्रेस ऑफ स्पायसेस या दोन कादंबऱ्या लिहून युरोप-अमेरिकेत चांगले यश संपादन केले आहे. चित्रा आधी चित्रे काढत असे. ''पण घरातल्या सगळ्या भिंती चित्रांनी भरल्यावर मी लेखणी हाती घेतली'' असे तिने म्हटले.

पिको अय्यर याची ख्याती प्रवासवर्णनात्मक पुस्तकांसाठी आहे. त्याने व्हिडिओ नाइट्स इन काठमांडू, फॉलिंग ऑफ दि मॅप, लेडी अँड दि माँक ही पुस्तके लिहिलेली आहेत. प्रवास हाच आपला व्यवसाय असून सतत धक्के खायला, आश्चर्यचकित व्हायला आणि शीर्षासन करायला आपण तयार असतो, असे त्याने म्हटले आहे. सांता बार्बरा येथे गेली ३० वर्षे पिको अय्यरचे वास्तव्य आहे. त्याने चर्चासत्रातील श्रोत्यांना उद्देशून म्हटले, ''तुम्ही अशा शहरात राहत आहात की तुमच्या आसपास चार वेगवेगळ्या संस्कृतीचे लोक राहतात आणि आठ भाषा बोलतात. तुम्ही सर्वजण प्रवासीच आहात. पण तुम्हाला ते माहीत नाही.''

थोरो आणि इमर्सन हे दोन अमेरिकन लेखक घरापासून फारसे दूरच्या प्रवासावर कधी गेले नाहीत; तथापि ते उत्तम प्रवासवर्णनपर म्हणून मला आदर्श वाटतात, असे पिको अय्यरने म्हटले आहे. लंडनमध्ये त्याचे बालपण गेले. त्या वेळी बरीच प्रवासवर्णने वाचनात आली. आपणही दूरदूरचे देश बघावेत, तिबेटसारखा जगातील अत्युच्च उंचीवरचा देश बघावा, ॲमेझॉन नदीच्या खोऱ्यात हिंडावे, अशी स्वप्ने तो बघत असे. ''लॉस एंजेलिस विमानतळावर मी आठ दिवस प्रवाशांची धावपळ बघण्यात घालविले. ते दिवस विलक्षण अनुभुती देणारे ठरले.'' असे त्याला वाटते.



फँटम्स इन दि ब्रेन या पुस्तकाचे लेखक व्ही. एन. रामचंद्र हे कॅलिफोर्निया विद्यापीठात मज्जासंशोधक म्हणून काम करतात. मेंदूला होणाऱ्या वेगवेगळ्या व्याधींचे वर्णन करणारे पुस्तक त्यांनी सँड्रा ब्लॅकली हिच्या सहकार्याने लिहिले. या व्याधी अत्यंत गुंतागुंतीच्या असून त्यांचा उलगडा करणे हा एखाद्या रहस्याचा उलगडा करण्यासारखा चित्तथरारक प्रकार असतो असे त्यांना वाटते.

दीपक चोप्रा सध्या 'हाऊ टू नो गॉड' (ईश्वर कसा ओळखावा) हे पुस्तक लिहिण्यात मग्न आहे. काळा हाफ शर्ट आणि स्लॅक अशा अनौपचारिक पोशाखातील दीपक चोप्राने मानवजात ही अनेक विसंगतींनी भरलेली गोष्ट असून सृजनशील आणि संहारक अशा दोन्ही शक्ती तिला अवगत आहेत, परंतु या शक्तींचा वापर विनाशासाठी करायचा की नव्या चैतन्यपूर्ण सहजीवनासाठी करायचा हे ठरविण्याची वेळ आली आहे; असे प्रतिपादन त्याने केले.

श्रीलंकेतील साहित्यकार मायकेल ओंडाइजे यांच्या 'दि इंग्लिश पेशंट' या पुस्तकाला सध्या मोठी मागणी आहे. त्या पुस्तकावर चित्रपटही निघाला. तोही गाजला. सध्या कॅनडामध्ये तो स्थायिक झाला आहे. प्रश्नोत्तराच्या एका सत्रात त्याला एका तरुणाने विचारले, ''रिचर्ड फोर्ड या कांदबरीकाराने म्हटले आहे की हजार दोन हजार पृष्ठे (दहा लाख शब्द) लिहून झाल्याशिवाय लेखकाला आपली शैली सापडत नाही. याबद्दल आपले काय मत आहे?''

''मला जेव्हा जेव्हा वाटते, की विशिष्ट शैली माझ्या लेखनात डोकावते आहे; तेव्हा मी लिहिणे बंद करतो.''

## 'प्रकाशनगरी काशी'चे प्रकाशन

''मला स्वतःला काशी हे शहर अजिबात आवडलेले नाही. पण पुष्पा त्रिलोकेकर यांचे 'प्रकाशनगरी काशी' हे पुस्तक मात्र वाचायला घेतल्यावर कधी संपले हेच कळले नाही. आपल्याला जे शहर आवडत नाही, त्या विषयीचे पुस्तक मात्र विलक्षण आवडावे हे माझ्या मते त्याचे मोठेच यश आहे.'' असे उद्गार विजय तेंडुलकर यांनी 'प्रकाशनगरी काशी' या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या वेळी काढले. श्रीविद्या प्रकाशनाचे हे पुस्तक मुंबईच्या राजा शिवाजी विद्यालयात शनिवार दि. १२ जून रोजी प्रकाशित करण्यात आले.

## 'स्वातंत्र्यलढ्यातील मी एक सैनिक'चे प्रकाशन

महाराष्ट्राचे माजी मंत्री व स्वातंत्र्यसेनानी श्यामराव पाटील यांच्या 'भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील मी एक सैनिक' या पुस्तकाचे प्रकाशन कोकण विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष शरद पालव यांच्या हस्ते बोर्डी येथे करण्यात आले.

## सानेगुरुजींचे स्मरण

सानेगुरुजींचे व्यक्तिमत्त्व व एकंदर आयुष्य म्हणजे निर्मळपणा, अंतर्बाह्य साधनशुचिता, मांगल्य आणि पावित्र्य यांचे आदर्श उदाहरण होय. त्यांच्या सहवासात घालवलेल्या काही क्षणांनी माझे आयुष्य परीसासारखे बदलून सुवर्णमय करून टाकले असे उद्गार जळगावचे ग्रंथालय चळवळीचे प्रमुख कार्यकर्ते मुरलीधरकाका गंधे यांनी काढले. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संचालित सानेगुरुजी केंद्रातर्फे साने गुरुजींची ४९ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

## राजेंद्र नाणावटी– ६०

बडोदा येथील प्राच्यविद्या मंदिराचे संचालक राजेंद्र नाणावटी यांच्या षष्ट्यब्दीनिमित्त यांच्या एसेज् ऑन संस्कृत पोएटिक्स आणि संस्कृत रुपको गुजरात नु प्रदान या पुस्तकांचे प्रकाशन पद्मश्री डॉ. के. का. शास्त्री यांच्या हस्ते झाले.

## ग्रामीण भागातून शहरात जाणारे लेखक

ग्रामीण जीवनातून शहरात जाणारा साहित्यकार साहित्य समृद्ध करतो. मात्र सभोवताली असलेल्या वास्तवाचा स्पर्श कवितेतून उमटला पाहिजे असे मत प्रा. नारायण कुलकर्णी कवठेकर यांनी पंढरीश चेके यांच्या चैतन्याची ओंजळ या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करताना व्यक्त केले.

## सांगाती पुरस्कार वितरण

दिल्ली विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख डॉ. निशिकांत मिरजकर यांच्या हस्ते बेळगाव येथील 'सांगाती पुरस्कारांचे' वितरण करण्यात आले. 'माती, पंख आणि आकाश.' (ज्ञानेश्वर मुळे) या पुस्तकाला मराठीतील उत्तम पुस्तकाचा दोन हजार रुपयांचा पुरस्कार देण्यात आला. उत्तम कांबळे यांच्या 'कावळे आणि माणसे' या पुस्तकालाही दोन हजार रुपयांचा 'कुसुमाग्रज' पुरस्कार देण्यात आला. डॉ. प्रसाद मिश्र (भारतीय अनुवाद कार्य पुरस्कार), सुषमा चौहान (तलाश ढाई आखर की– भारतीय भाषा साहित्य पुरस्कार) यांनाही सन्मानित करण्यात आले. ''समाजातील प्रत्येक घटना साहित्यात प्रतिबिंबित होत असल्याने समाज आणि साहित्य यात अतूट नाते निर्माण होते,'' असे डॉ. मिरजकर यांनी विशद केले.

## स्कॉलास्टिक बाल पुस्तक जत्रा

'स्कॉलास्टिक' या प्रख्यात अमेरिकन प्रकाशनसंस्थेच्या भारतातील शाखेतर्फे बाल व कुमारवयीन विद्यार्थ्यांसाठी मुंबईत चार पुस्तक जत्रा भरवण्यात आल्या. ८ जून रोजी सायंकाळी ६ वाजता विजय तेंडुलकर यांच्या हस्ते पहिल्या पुस्तक जत्रेचे उद्घाटन



यशवंतराव चव्हाण केंद्र, नरीमन पॉईंट येथे झाले.

७७ वर्षापूर्वी रॉबिन्सन नावाच्या एका शिक्षकाने एका मासिकाच्या रूपाने अमेरिकेत या प्रकाशन संस्थेची स्थापना केली. भारतात सुरू झालेल्या शाखेचे प्रमुख नॅशनल बुक ट्रस्टचे माजी संचालक श्री. अरविंदकुमार हे आहेत. मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी पुस्तक जत्रा व स्कॉलास्टिक बुक क्लब अशा दोन योजना राबविल्या जात आहेत.

स्कॉलास्टिकच्या स्वतःच्या पुस्तकांखेरीज जगातील अन्य उत्कृष्ट बालवाङ्मयाच्या प्रकाशकांची तसेच भारतीय प्रकाशकांची पुस्तकेही या पुस्तक जत्रेत उपलब्ध होती. चव्हाणसेंटरमधील जत्रेनंतर सावरकर हॉल शिवाजी पार्क (१६ ते २९ जून), उत्कर्षमंडळ, विलेपार्ले (२३ ते २७ जून) आणि म. फुले चॅरिटेबल ट्रस्ट, सेक्टर १७, वाशी (३० जून ते ४ जुलै) येथे या जत्रा भरविण्यात आल्या.

## रविप्रकाश कुलकर्णींना पुरस्कार

मुंबई मराठी पत्रलेखक संघ यांच्यातर्फे विविध पारितोषिके दिली जातात. त्यात उत्तम सदर लेखनाचे १९९९ चे पारितोषिक डोंबिवलीचे रविप्रकाश कुलकर्णी यांना देण्यात आले आहे. सामना आणि चित्रलेखा यामध्ये त्यांचे साहित्यविषयक लोकप्रिय सदर असते.

## 'राजरस्ता दाखविण्याची नवोदित साहित्यिकांवर जबाबदारी'

दूरदर्शरूपी 'इडियट बॉक्स'ने प्रेक्षकांना मनाने आणि शरीरानेही पांगळे बनवले आहे, अशा परिस्थितीत त्यांना सत्य-शिव आणि सुंदर याचा राजरस्ता दाखवण्याची जबाबदारी नवोदित साहित्यिकांवर आहे असे मत, पानिपतकार विश्वास पाटील यांनी सहाव्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना व्यक्त केले.

'साहित्य कलायात्री' तर्फे आयोजित संमेलनाचे उद्घाटन एम.आय.टी चे संचालक डॉ. विश्वनाथ कराड यांच्या हस्ते झाले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून 'मृत्युंजय'कार शिवाजी सावंत, स्वागताध्यक्ष विजय कोलते, संमेलन समिती अध्यक्ष शांतीलाल सुरतवाला तसेच कार्याध्यक्ष दादासाहेब लोणकर व्यासपीठावर उपस्थित होते.

शहरातून मराठीची थोडी पीछेहाट होत आहे. परंतु वाढत्या शिक्षण प्रसाराबरोबर खेड्यापाड्यांतून जो नवा वाचकवर्ग झपाट्याने पुढे येत आहे, तोच मराठीचा जगन्नाथाचा रथ यापुढे ओढणार आहे. समाजाला वेठीस धरणाऱ्या शक्तिविरोधी नव्या साहित्यिकांच्या लेखण्या खऱ्या अर्थी बंड करून उठतील, असा विश्वास श्री. पाटील यांनी व्यक्त केला.

नवोदितपणाचा छाप काही दिवस बरा वाटतो. नंतर मात्र या शिक्क्याची रुखरुख येऊ लागते. पण वाङ्मय सेवेची उत्तुंग शिखरे गाठणाऱ्या प्रत्येक भाषाप्रभूला या प्रवेशद्वारातून

जावेच लागले होते. नवोदितांच्या मंडपातून जेव्हा आपल्या रसिल्या साहित्यकृती घेऊन साहित्याचे नवे मानदंड उभे राहतील, तेव्हाच अशा साहित्य संमेलनाचा उद्देश सफल होईल असे ते म्हणाले.

ज्या शब्दांनी उमाळा येत नाही अशा शब्दांना अर्थच नाही, तेव्हा अभ्यास चिंतनाशिवाय व मनाला पटल्याशिवाय लिहूच नका असे आवाहन श्री. सावंत यांनी केले. प्रत्येक साहित्यिकाने संत वाङ्मयाचा अभ्यास केलाच पाहिजे असे मत डॉ. कराड यांनी आपल्या उद्‌घाटनपर भाषणात व्यक्त केले. या वेळी ॲड. म.स. केळकर, एकनाथ गौल, अविनाश कांबळे यांना शिवाजी सावंत तर रवी जोशी, जयवंत गायकवाड, इंदुमती लांडगे व अर्चना पाटील यांना 'कविवर्य जगदीश खेबुडकर' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

## 'पहिले लेखन प्रसिद्ध झाल्याचा आनंद अवर्णनीयच होता'

''पहिली कथा, लेख वा कविता प्रसिद्ध झाल्याचा आनंद अवर्णनीय होता. त्यामुळे पुढील लेखन करण्याला मोठी प्रेरणा मिळाली. नवोदित असताना काही कटू प्रसंगांना सामोरे जावे लागले. परंतु अशा प्रसंगांतून नाउमेद न होता योग्य तो धडा घेत साहित्यसेवा करत राहिलो.''

सहाव्या अखिल भारतीय नवोदित साहित्य संमेलनात 'आम्ही नवोदित असताना आम्हाला आलेले अनुभव' या विषयावरील परिसंवादात साहित्यिक व अभ्यासक हे अनुभवाचे बोल सांगत होते.

वडील ग. ह. पाटील हे साहित्यिक असल्यामुळे आपल्याला मोठा फायदा झाला असे नमूद करून डॉ. मंदा खांडगे म्हणाल्या, ''साहित्याच्या वातावरणात लहानपणापासून वावरत असल्यामुळे मोठमोठ्या साहित्यिकांना जवळून पाहता आले. त्यांच्या कार्याचा मनावर ठसा उमटला गेला व त्यामुळेच आपण काहीतरी लिहावे अशी प्रेरणा मिळाली.''

'महात्मा फुल्यांची बदनामी : एक सत्यशोधन' या आपल्या पहिल्या पुस्तकाचे ज्येष्ठ साहित्यिक पु.ल.देशपांडे यांच्या हस्ते १९८८ मध्ये प्रकाशन झाले, हा आयुष्यातील आनंदाचा क्षण आहे, असे श्री. नरके यांनी सांगितले. ''पहिल्याच पुस्तकाचे मोठे कौतुक झाले. अनेक वृत्तपत्रांनी या पुस्तकावर लेख लिहिले. त्यामुळे पहिली आवृत्ती फक्त तीन महिन्यांत संपली,'' असे त्यांनी नमूद केले.

दहावीत असताना नाटक लिहिल्याने मुख्याध्यापकांनी खूप कौतुक केले, तसेच कला शाखेच्या द्वितीय वर्षात पहिली कथा प्रसिद्ध होऊन तीन रुपये मानधन मिळाले, अशी आठवण सांगत प्रा. व. बा. बोधे म्हणाले, ''अनेक कथा साभार परत आल्या, परंतु नाउमेद न होता लिहित राहिलो. १९७५ मध्ये लिहिलेल्या 'जंगल' या पहिल्या कादंबरीने मात्र



मनस्ताप सोसावा लागला.''

## पाठ्यपुस्तमंडळाचा वाढता व्याप

पाठ्यपुस्तक महामंडळातर्फे आतापर्यंत सात भाषांमध्ये पाठ्यपुस्तके प्रकाशित करण्यात येत होती, यंदा तेलगु भाषेचाही समावेश करण्यात आला आहे.

आठ भाषांमध्ये यंदा इयत्ता पहिलीची ८४ लाख ६० हजार, तर पाचवीची १ कोटी १४ लाख नवी पुस्तके प्रकाशित करण्यात आली. पाठ्यपुस्तक मुद्रण-पुनर्मुद्रण कार्यक्रमांतर्गत १९९९-२००० या शालेय वर्षात एकूण ७ कोटी ७ लाख ६१ हजार प्रतींची छपाई झाली.

पुस्तकपेढी आणि शैक्षणिक दृष्ट्या अविकसित १०३ कमकुवत गटांतील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचा पुरवठा मंडळाच्या विभागीय भांडाराकडून करण्यात आला. कमकुवत गटातील लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या २५ लाख १५ हजार असून त्यावर १२ कोटी ५० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

## नवथरची काव्यमैफल

साने गुरुजी यांच्या पुण्यतिथी निमित्ताने परळी वैजनाथला नवथर साहित्य मंडळाने शहर कामगार कल्याण केंद्रात कवी संमेलन घेतले.

या वेळी साने गुरुजी यांच्यावर आबासाहेब वाघमारे, चंपालालची दरगड, थोरात यांची भाषणे झाली. शशी सारस्वत (गझलगायक) यांनी आपल्या गोड आवाजात काही गाणी सादर केली. कवी संमेलनात चंपालालजी दरगड, आबासाहेब वाघमारे, पेंटर सारस्वत, राजपाला कांबळे, राजकुमार कदम, वैजनाथ गायकवाड, गौतम कद्रे, सुभाष कद्रे, राजेंद्र जाधव, प्रदीप बुक्तर, रामेश्वर घोडके यांनी कविता सादर केल्या.

## 'सृजन'च्या व्यासपीठाचा लेखकांनी अधिकाधिक वापर करावा : मोघे

''एकांकिकेच्या रूपाने सामान्यांच्या मनाला भावणारा विषय प्रकट होतो. 'सृजन' हे लेखनासाठी एक व्यासपीठ आहे. त्याच्या आधाराने लेखकाने आपले पंख शक्य तितके पसरावेत'', असे आवाहन अभिनेते श्रीकांत मोघे यांनी केले. सृजन एकांकिका लेखनस्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. ते म्हणाले, ''आपण गुणाढ्य आहोतच. या देशात चित्रपटसृष्टीचा प्रारंभ मराठी भाषेतील चित्रपटाने झाला. आजच्या मराठीच्या अवस्थेला आपणच जबाबदार आहोत. ही परिस्थिती बदलली पाहिजे म्हणूनच अंतःकरणापासून, उमाळ्याने जे काही लिहिता येईल, ते लेखकांनी लिहिले पाहिजे.''

आपल्याकडे मुळातच असणाऱ्या गुणवत्तेचा विकास केला पाहिजे, असे सांगून मोघे म्हणाले, ''आज हिंदी चित्रपटसृष्टीत इतर भाषकांचे असे वेगवेगळे गट आहेत; परंतु मराठी

भाषकांचा मात्र गट नाही. आपल्याकडील लोकांची एकजूट नाही हे माझ्या मनातले शल्य आहे.''

परीक्षक दिलीप कोल्हटकर, अनंत कुलकर्णी आणि सेवा चव्हाण हे होते. कोल्हटकर म्हणाले, ''एकांकिका लेखन स्पर्धेबरोबरच लेखकांसाठी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यातही 'सृजन'ने पुढाकार घ्यावा.''

'सृजन'च्या कार्याची माहिती राज्यात सर्वदूर गेली पाहिजे, असे प्रथम पारितोषिक विजेते मनोज कोल्हटकर यांनी सांगितले. ''विशेषतः 'स्क्रिप्ट-बँके' हा महत्त्वाचा उपक्रम आहे. कोणतेही नाटक बसवताना उत्कृष्ट, नावीन्यपूर्ण लेखनाची चणचण भासते, ती या उपक्रमाद्वारे भरून निघेल.''

'सृजन'कडे 'स्क्रिप्ट-बँके'मध्ये नव्या-जुन्या सातशे संहिता आहेत, अशी माहिती सुनील चौधरी यांनी दिली. मोघे यांच्या हस्ते स्पर्धेच्या माहिती पुस्तकाचे प्रकाशन झाले व विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली.

## कुसुमाग्रज स्मारकासाठी ५० लाखांचा पहिला हप्ता

ज्येष्ठ साहित्यिक वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचे नाशिक येथे यथायोग्य स्मारक उभारण्यासाठी राज्य सरकारतर्फे 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान' ला ५० लाख रुपयांचा निधी दिल्याची माहिती मुख्यमंत्री नारायणराव राणे यांनी दिली.

कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे उभारण्यात येणाऱ्या स्मारकात खुले नाट्यगृह, वाचनालय, तारांगण आदींचा समावेश आहे. हे स्मारक उभारण्यासाठी राज्य सरकार सर्व ती मदत करण्यास कटिबद्ध असल्याचे सांगून मुख्यमंत्री पुढे म्हणाले, की त्या स्मारकासाठी किती खर्च येईल याचा प्रस्ताव राज्य सरकारने कुसुमाग्रज प्रतिष्ठानकडे मागितला होता. प्रतिष्ठानने पाच कोटी २५ लाखांचा प्रस्ताव दिल्यावर राज्य सरकारने सुधारित प्रस्ताव पाठविण्याची सूचना प्रतिष्ठानला दिली. तत्पूर्वी स्मारकाच्या इतर कामांत अडथळे येऊ नयेत म्हणून सांस्कृतिक कार्य विभागातर्फे निधीचा पहिला हप्ता मंजूर करण्यात आला आहे.

## 'असेच प्रेम करीत आयुष्याच्या सेंच्युरीपर्यंत सांभाळून घ्या'

नाट्य-चित्रपट कलेवर प्रेम करणाऱ्या रसिकांनीच मला मोठे केले. माझे तोंड भरून कौतुकही केले. असेच प्रेम करीत मला आयुष्याच्या 'सेंच्युरी'पर्यंतही सांभाळून घ्या, असे उद्गार अठ्ठ्याऐंशी वर्षांच्या वसंत शिंदे यांनी काढले. तेव्हा या विनोदमूर्तीच्या प्रत्येक शब्दाला खळखळून दाद देणाऱ्या रसिकांचे डोळे पाणावले.

वसंत शिंदे यांच्या 'विनोदवृक्ष' या आत्मकथनपर पुस्तकाचे मंजुल प्रकाशनाच्या वतीने



लोकप्रिय अभिनेते अशोक सराफ यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. 'सकाळ'चे संपादक विजय कुवळेकर अध्यक्षस्थानी होते. विविध भूमिका साकारलेल्या शंभर नाटकांच्या व लोकनाट्यांच्या पटकथा वसंत शिंदे यांनी भरत नाट्य संशोधन मंडळाला भेट दिल्या. या कार्यक्रमाला साजेसे विनोदवृक्षाचे नेपथ्य आणि याच वृक्षाखाली रंगलेल्या प्रकाशन सोहळ्यात मान्यवर स्थानापन्न झाल्यानंतर झाडामागे लपलेल्या वसंत शिंदे यांनी घेतलेली 'एन्ट्री' ही रसिकांची दाद मिळवून गेली.

एरवी प्रत्येक वाक्यागणिक मिष्किल कोट्या करणाऱ्या वसंत शिंदे यांनी कृतज्ञता व्यक्त करणारे छोटेसेच भावनोत्कट मनोगत व्यक्त केले. रसिकांना अभिवादन करून ते म्हणाले, आपल्यामुळे मला आजवर भरभरून प्रसिद्धी, कौतुक मिळाले. आत्मचरित्र लिहिण्याची इच्छाही मधू पोतदार 'खनपटीला' बसल्याने पूर्ण झाली. आता आयुष्याची 'सेंच्युरी' गाठण्याची इच्छा आहे. आजवर तुम्ही सांभाळून घेतलेच, यापुढील काळातही सांभाळून घ्या.

वसंत शिंदे यांच्यामुळेच आपल्या 'कॉमेडी'च्या ढगांची मुहूर्तमेढ रोवली गेली, असे सांगून अशोक सराफ म्हणाले की, मुंबईला सेंट जॉर्ज प्रशालेत होणारी नाटके आपण ऑर्गनवाल्याशेजारी बसून पाहिलेली आहेत. त्याच वेळी वसंत शिंदे यांचा अभिनय माझ्या मनावर ठसला. पटकथेतील सर्वच व्यक्तिरेखांमधील बारीकसारीक तपशील टिपून त्यावर मार्मिक विनोद करण्याची सवय आपल्यालाही लागली. त्यामुळेच भूमिकेबद्दलचा विचार वाढून माझ्या विनोदाला वेगळेपणा प्राप्त झाला आणि साकारलेल्या भूमिका लोकप्रिय होऊ शकल्या.

## वादग्रस्त लीळाचरित्रावरील बंदीला न्यायालयाची स्थगिती

वादग्रस्त 'लीळाचरित्र' ग्रंथावरील बंदीला उच्च न्यायालयाचे न्यायाधीश ए.बी. पालकर यांनी दिलेल्या स्थगनादेशामुळे 'लीळाचरित्र' पुन्हा चर्चेत आले आहे. या लीळाचरित्राचे संपादक माजी कुलगुरू डॉ. वि.भि. कोलते यांना या ग्रंथासंदर्भात सतत मोठ्या दबावाला तोंड द्यावे लागले. परंतु त्यांनी आपल्या संशोधना संदर्भात माघार घेतली नाही. त्यांच्या निधनानंतर महिनाभरातच अमरावती जिल्हा न्यायालयाने वि.भि. कोलते लिखित संशोधनावर बंदी आणून ग्रंथाच्या प्रती जप्त करण्याचे, त्याचे वितरण थांबविण्याचे कनिष्ठ न्यायालयाने दिलेले आदेश कायम ठेवले. तसेच कोलते यांनी निधनापूर्वी दाखल केलेली याचिका निकालात काढली.

अमरावती जिल्हा न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाचे आदेश कायम ठेवल्याने शेवटी डॉ. कोलते यांचे चिरंजीव दिलीप कोलते यांनी, तसेच महानुभाव पंथाचे अध्यक्ष नागराज बाबा, धुळ्याचे महंत साळकर बाबा, महंत पंडित बाबा यांच्यासह इतर महंतानीही वेगवेगळ्या याचिका उच्च न्यायालयात सादर केल्या. त्या सर्व एकत्रित दाखल करून घेताना न्यायाधीश

पालकर यांनी जिल्हा न्यायालयाच्या बंदी निर्णयाला स्थगिती दिली.

'लीळाचरित्र' डॉ. वि.भि. कोलते यांनी लिहिलेले नाही, तर ते त्यांचे संशोधनात्मक काम आहे. महानुभव पंथासंदर्भात प्रगाढ संशोधन आणि अभ्यास केल्यामुळे त्यांच्यावर ते काम सोपविण्यात आले होते. या ग्रंथात ज्या चुका असल्याचा आक्षेप घेतला जातो, तो मजकूर निरनिराळी हस्तलिखिते, तसेच इतर उपलब्ध साहित्यातून घेण्यात आला आहे. डॉ. कोलते यांनी जे संदर्भ या ग्रंथासाठी वापरले त्यांचा स्पष्ट निर्देश या ग्रंथातच करण्यात आला आहे. कनिष्ठ न्यायालयाने या मुद्द्यांकडे दुर्लक्ष केले असल्याची तक्रार संबंधित याचिकेत करण्यात आली आहे.

## क्रीडाविषयावरील साहित्याची दखल घेतली जावी : माधव मंत्री

क्रीडा विषयावर लिहिलेल्या साहित्याचीही दखल घेतली जावी, अशी अपेक्षा ज्येष्ठ क्रिकेटपटू माधव मंत्री यांनी व्यक्त केली.

आपल्या शैलीदार आणि दर्जेदार फलंदाजीने क्रिकेट जगतात मानाचे स्थान मिळवलेल्या सचिन तेंडुलकर याच्याविषयी प्रसिद्ध क्रिकेट समीक्षक बाळ पंडित यांनी लिहिलेल्या पुस्तकाच्या प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. ज्येष्ठ क्रिकेटपटू चंदू बोर्डे; तसेच प्राचार्य बाळ गाडगीळ, डॉ. द. दि. पुंडे आदी उपस्थित होते. सचिनवरील या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने क्रिकेटवरील गप्पांची एक मैफलच रंगली. वेगवेगळे दिग्गज क्रिकेटपटू आणि त्यांच्या तऱ्हा याची रंजक माहिती श्री. मंत्री यांनी दिली. सचिनच्या खेळाचे कौतुक तर साऱ्यांनीच केले; पण त्याचबरोबर त्याचा विनम्र आणि निगर्वी स्वभाव, सर्वांना आदराने वागविण्याची वृत्ती यांच्याही आठवणी वक्त्यांनी सांगितल्या.

श्री. मंत्री हे स्वतः क्रिकेटपटू असून सचिनचा खेळ त्यांनी सुरुवातीपासून पाहिला आहे. १९९० मध्ये भारतीय संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर गेला होता. त्या संघाचे ते व्यवस्थापक होते. विक्रमवीर सुनील गावसकर याचे ते मामा. क्रिकेटविषयक अनेक किस्से त्यांनी सांगितले. सर डॉन ब्रॅडमन आणि सचिन यांच्या खेळाविषयी त्यांनी माहिती दिली.

'' क्रिकेटविषयी आपल्याकडे कमालीची उत्सुकता आहे. ती भागविण्यासाठी त्याबाबतचे लिखाण सातत्याने व्हायला हवे,'' असे प्राचार्य गाडगीळ यांनी सांगितले. भारतीय क्रिकेटचा इतिहास लिहिणे गरजेचे आहे, असे डॉ. पुंडे यांनी नमूद केले. या दोन्ही वक्तव्याचा संदर्भ घेऊन श्री. मंत्री म्हणाले, ''क्रीडा विषयावर लिहिलेल्या साहित्याची दखल सर्व स्तरांवरून घेणे गरजेचे आहे. हा वेगळा साहित्यप्रकार समजून, त्यातील दर्जेदार साहित्याला पारितोषिकही दिले पाहिजे.''

श्री. बाळ पंडित यांनी पुस्तकाविषयी मनोगत व्यक्त केले. सचिनसारख्या महान



खेळाडूचे चरित्र तरुण पिढीसमोर ठेवण्याच्या उद्देशाने हे पुस्तक लिहिल्याचे त्यांनी नमूद केले. उत्कर्ष प्रकाशकाचे सु.वा. जोशी यांनी स्वागत केले.

## बाळ सामंत— अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण

'प्रेम, मरण यासारख्या मानवी अस्तित्वाच्या मूलभूत प्रश्नांवर गांभीर्यपूर्वक तसेच छत्रपती शिवाजी महाराज, बालगंधर्व, रिचर्ड बर्टन या व्यक्तींवर संशोधनात्मक लिहितानाच, दुसरीकडे खुसखुशीत विनोदी लेखन करणारे बाळ सामंत हे व्यक्तिमत्त्व स्वतःच एक संशोधनाचा विषय आहे', असे सांस्कृतिक कार्यमंत्री प्रमोद नवलकर यांनी म्हटले. ५० वर्षांत ५३ ग्रंथ लिहिलेल्या लेखक बाळ सामंत ७५ व्या वाढदिवसानिमित्त प्रा. गंगाधर गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने वांद्रे येथील 'रंगशारदे'त त्यांचा सत्कार केला.

अध्यक्ष प्रा. गंगाधर गाडगीळ यांच्या हस्ते मानचिन्ह-मानपत्र देण्यात आले. ते म्हणाले, जवळचा मित्र असूनही ज्याच्याविषयी मला अजब वाटत राहतं, असा हा माणूस आहे. अमेरिकेत स्थायिक झालेले श्री. विजय व राजीव सामंत यांनी 'आपल्या या व्यवहारशून्य पित्याने आपल्यावर पैशाच्या मागे न धावता विद्येची, ग्रंथवाचनाची कास धरण्याचे व माणसे जोडण्याचे संस्कार कसे केले, हे सांगितले. बाळ सामंतांचे बंधू श्यामराव यांची कन्या न्यायमूर्ती रंजना देसाई यांनी म्हटले, ''वयाच्या ७५ व्या वर्षीही बाळ सामंतांनी बौद्धिक कुतूहल आणि अपरिमित उत्साह शाबूत ठेवला आहे.'' शासनाचे सांस्कृतिक कार्यसंचालक न. नि. पटेल यांनी आभारप्रदर्शन केले.

बाळ सामंत यांनी आपल्या सर्व स्नेह्यांचे, आपला संसार 'साजरा' करणाऱ्या पत्नीचे आभार दोन वाक्यात मानले. बालगंधर्व यांचे चिरतरुण नाटक संगीत 'स्वयंवर' यांचा संक्षिप्त दोन अंकी प्रयोग या वेळी सादर करण्यात आला

## महादेव मोरे यांचा एकसष्टीनिमित्त नागरी सत्कार

निपाणीचे ज्येष्ठ साहित्यिक महादेव मोरे यांचा एकसष्ठीनिमित्त नागरी समिती व अंकुर साहित्य मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानी साहित्यिक रंगराव बापू पाटील होते. यावेळी आनंद यादव यांनी आपले विचार मांडले. ते म्हणाले स्वातंत्र्योत्तर काळातील साहित्यिकांच्या दुसऱ्या पिढीने ग्रामीण जीवनातील अठरा पगड जाती आणि बलुतेदारांना प्रत्यक्ष पाहात साहित्याची निर्मिती केली. म्हणूनच खरे ग्रामीण जीवनदर्शन दुसऱ्या पिढीनेच घडवले व त्यामध्ये महादेव मोरे यांचा वाटा मोलाचा आहे.

यावेळी डॉ. आनंद यादव यांनी शाल, श्रीफळ व पुष्पहार देवून महादेव मोरे यांचा

यथोचित नागरी सत्कार केला. मेहता पब्लिशिंग हाऊसचे श्री. अनिल मेहता यांनीही यावेळी मोरे यांचा सत्कार केला.

## ... खूप काही जिवंत असल्याचा 'मुद्रा' मधून संदेश

''सर्व काही संपले आहे, असे वाटत असताना अजून खूप काही जिवंत असल्याचा संदेश 'मुद्रा' मधून मिळतो, असे गौरवोद्गार काँग्रेस महासमितीचे सरचिटणीस सुशीलकुमार शिंदे यांनी सुधीर गाडगीळ यांच्या 'मुद्रा' या पुस्तकाचे प्रकाशन करताना पुणे येथे काढले.

अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत प्रा. ग.प्र. प्रधान होते. आगळी वेगळी दैनंदिनी जगणाऱ्यांची व्यक्तिचित्रे श्री. गाडगीळ यांनी 'सकाळ' मध्ये रेखाटली होती. 'मुद्रा' हे त्याचेच पुस्तक रूप असून, उत्कर्ष प्रकाशनातर्फे ते प्रसिद्ध करण्यात आले आहे.

श्री. शिंदे म्हणाले, ''ही सारी व्यक्तिचित्रे विलक्षण आहेत, सकृतदर्शनी छोटी वाटणारी ही माणसे भविष्यातील फार मोठे लोक आहेत. बाकी कशाची पर्वा न करता ते श्रम करत आहेत. त्यांच्या श्रमाला व कष्टाला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम पुस्तकाने केले आहे. ज्यांना शब्द सापडत नाहीत, आत्मचरित्र लिहिता येत नाही, भावना व्यक्त करता येत नाही, पण ज्यांचे काम मोठे आहे, अशी माणसे श्री. गाडगीळ यांनी नेमकेपणाने टिपली आहेत. या व्यक्तिचित्रांतून तरुणांना निश्चिपणे प्रेरणा मिळू शकेल. कारण आंतरिक शक्ती अणुबाँबपेक्षाही मोठी असते. त्यामुळे लढणे महत्त्वाचे आहे. हा बोध ती देतात.''

या पुस्तकातील प्रत्येक व्यक्तिरेखा समाजाला धक्के देणारी आहे. त्यांचा पुणेकरांनी स्वीकार केला आहे, ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. अशा धक्क्यांचा स्वीकार करणारा समाजच पुढे जाऊ शकतो.

प्रा. प्रधान म्हणाले, ''या पुस्तकातून होणारे सामान्यांच्या असामान्यपणाचे दर्शन विस्मयकारक व आनंददायक आहे. या पुस्तकातून भेटणारी माणसे ही समाजाचे अज्ञात आधार आहेत. त्यांच्यामुळेच समाज सुसंस्कृत होतो.''

ते म्हणाले, ''ही सारी असामान्य, पण सहसा न भेटणारी आहेत; पण त्यांच्याविषयी वाचून आपला भावबंध त्यांच्याशी जुळून जातो. तात्कालिकातून शाश्वताकडे त्यांचा प्रवास सुरू असतो. त्यांच्या चिरंतनपणावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न श्री. गाडगीळ यांनी केला आहे. या पुस्तकामुळे आपले जीवन अधिक मधुर होते.''

प्रारंभी मनोगत व्यक्त करताना सुधीर गाडगीळ म्हणाले, ''प्रकाशात नसणाऱ्या, पण जगावेगळ्या आवडीनिवडी जपणाऱ्या माणसांविषयी माझ्या मनात विलक्षण औत्सुक्य आहे. त्यातूनच या व्यक्तिरेखा रेखाटल्या गेल्या.''



## नवोदितांसाठी साहित्य सहकार

सोलापूर जिल्ह्यातील नवोदित साहित्यिकांना प्रेरणा देण्याच्या उद्देशाने जिल्हा पातळीवर 'साहित्य-सहकार मंडळाची' स्थापना करीत असल्याची घोषणा उदयसिंह मोहिते-पाटील यांनी केली. या मंडळाच्या माध्यमातून दरवर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या जयंतीनिमित्त कविसंमेलन भरविण्यात येईल. या संमेलनातून सर्वोत्कृष्ट कवींची निवड करून पुरस्कार देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

## सहकारनेते निर्माण करण्यासाठी 'परिसस्पर्श' मार्गदर्शक

सहकाराचा पाया रोवणाऱ्या यशवंतराव चव्हाण, धनंजय गाडगीळ आणि बाळासाहेब विखे-पाटील यांच्यासारख्या नेत्यांची आज महाराष्ट्राला गरज असून, असे नेते निर्माण करण्यासाठी 'परिसस्पर्श' हे पुस्तक नव्या पिढीला मार्गदर्शक ठरेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक गंगाधर गाडगीळ यांनी केले.

सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्यावरील प्रमोद जोशी लिखित 'परिसस्पर्श' या चरित्रग्रंथाचे प्रकाशन गाडगीळ यांच्या हस्ते अकलूज येथे झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ साहित्यिक द.मा. मिरासदार होते.

या वेळी कवयित्री शांता शेळके, रामदास फुटाणे, ना. सं. इनामदार, फ.मु. शिंदे, अरुणा ढेरे, नारायण सुर्वे, नारायण सुमंत, शंकर बडे, विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या पत्नी श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील उपस्थित होत्या.

माणसं जोडणे हे सहकाराचे सर्वांत मोठे भांडवल आहे, असे सांगून गाडगीळ आपल्या भाषणांत म्हणाले की, आज अकलूजचा जो कायापालट झालेला आहे, तो शंकरराव मोहिते-पाटील यांच्या या भांडवलातूनच झालेला आहे. त्यांनी केवळ माणसंच जोडली नाहीत, तर ती टिकवून त्यातून सहकाराचा पाया अधिकाधिक भक्कम कसा करता येईल, हे पाहिले.

'परिसस्पर्श' या पुस्तकाबद्दल बोलताना गाडगीळ म्हणाले की, या पुस्तकाला लालित्याची छटा आहे. त्यामुळे ते वाचनीय झाले आहे. या पुस्तकातून केवळ शंकरराव आपल्यापुढे साकार होत नाहीत, तर तत्कालीन परिस्थिती वेगवेगळ्या स्वभावाची माणसं आणि शेतकऱ्यांचे जीवन याचेही आपल्याला दर्शन घडते. शंकररावांजवळ असलेली जिद्द, माणसं जोडण्याची कला, आत्मविश्वास, अथक परिश्रम आणि चिकाटी या पैलूंचेही दर्शन या पुस्तकातून आपल्याला घडते.

आपल्या अध्यक्षीय भाषणात द.मा. मिरासदार म्हणाले की, शंकररावांच्या जीवनपटाला दिलेले 'परिसस्पर्श' हे नाव अगदी योग्य आहे. माझा जन्म या अकलूजमध्ये झाला. त्या

काळी अकलूजमध्ये माळरानाशिवाय दुसरे काहीही नव्हते, परंतु शंकररावांनी अथक परिश्रमातून या माळरानावर आज नंदनवन फुलवले आहे. त्यांच्या स्पर्शातूनच अकलूजचा हा कायापालट झालेला आहे.

पुस्तकाचे लेखक प्रमोद जोशी म्हणाले की, शंकररावांचे व्यक्तिमत्त्व ऐकून मी अस्वस्थ झालो. त्या अस्वस्थतेतूनच हे चरित्र लिहिण्याचे मी ठरवले. एवढे अफाट व्यक्तिमत्त्वाला शब्दांच्या कप्प्यात बंद करणे हे माझ्यापुढे एक मोठे आव्हानच होते.

शंकरराव मोहिते-पाटील यांचे चिरंजीव आणि राज्य कुक्कुटपालन संघाचे उदयसिंह मोहिते-पाटील यांनी प्रास्ताविक आणि आभारप्रदर्शन केले.

## बालसाहित्य क्षेत्रांतील अभिमानास्पदकार्य

अ.भा. मराठी बालकुमार साहित्य संमेलन ही पुण्यात स्थापन झालेली संस्था गेली २५ वर्षे बालसाहित्याच्या सर्वांगीण अभिवृद्धीसाठी विविध प्रकारचे उपक्रम राबवत आलेली आहे. दर वर्षाआड साहित्यसंमेलन घेऊन बालसाहित्यिकाना एकत्र आणून आणि बाललेखक-प्रकाशक-संपादक-चित्रकार वगैरे संबंधित घटकांमध्ये वैचारिक देवाणघेवाण करण्यासाठी एक बहुमोल व्यासपीठ या संस्थेच्या माध्यमातून तयार झाले आहे. भा.रा. भागवत, लीलावत भागवत, अमरेंद्र गाडगीळ, यदुनाथ थत्ते, राजा मंगळवेढेकर, सुमती पायगावकर, मालती दांडेकर, सुधाकर प्रभू, महावीर जोंधळे, दिनकर देशपांडे, प्रभाकर पुराणिक, शंकर सारडा प्रभृतींनी या संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बालवाङ्मयाबद्दल वाचक, पालक-शिक्षकांमध्ये एक प्रकारची जागृती निर्माण केली आहे; तसेच बालसाहित्य हा प्रकार उपेक्षित राहू नये म्हणून अनेक उपक्रमांचीही योजना केली आहे. उत्तम दर्जाचे बालसाहित्य निर्माण व्हावे यासाठी सुमारे वीस प्रकारचे पुरस्कार संस्थेने ठेवले असून दरवर्षी त्यांचे समारंभपूर्वक वितरण करण्यात येते. बालसाहित्यक्षेत्रात बहुमोल कामगिरी करणाऱ्या व्यक्तीला दोन हजार रुपयांचा दिनकर लोखंडे पुरस्कार देण्यात येतो; तर बालवाङ्मयविषय संशोधनात्मक प्रकल्पाला एक हजार रुपयांचा अमरेंद्र गाडगीळ पुरस्कार देण्यात येतो. त्याशिवाय निरनिराळ्या वृत्तपत्रांनी बालपुस्तकांवरील अभिप्राय व समीक्षा प्रसिद्ध करावी आणि समीक्षकांनीही बालसाहित्याची दखल आवर्जून घ्यावी म्हणून सीताबाई भागवत बालसाहित्य पुरस्कार (पाचशे रुपयांचा) ठेवण्यात आला आहे.

त्या त्या वर्षातील उत्तम बालकादंबरी, कथा, काव्यसंग्रह, एकांकिका, अनुवादित पुस्तक, चरित्र, सजावट, नाटक, विज्ञानविषयक पुस्तक, किशोरकथा वगैरे प्रकारातील पुस्तकांना प्रत्येकी ५०० रुपयांचा पुरस्कार देण्यासाठीही विविध व्यक्तींकडून ठेवी मिळवण्यात आल्या आहेत. उत्तम बालमासिकाला 'बालमित्र' पुरस्कार देण्यात येतो. छंद-क्रीडाविषयक



पुस्तकालाही स्वतंत्र पुरस्कार आहे.

१ मे १९७५ रोजी बालकुमार साहित्य संमेलनाची स्थापना झाली आणि दोन वर्षांनी पहिले अधिवेशन पुणे येथे झाले. हे पुरस्कार गेल्या अनेक वर्षांत क्रमाक्रमाने वाढत वीसाच्या घरात गेले.

१९९८ मधील पुरस्कारासाठी त्या वर्षात प्रसिद्ध झालेली पुस्तके दि. ३० जुलैपर्यंत पाठविण्याची मुदत आहे. सप्टेंबरमध्ये पुरस्कारांची घोषणा होईल.

१९९९ मधील पुस्तकेही जशी प्रसिद्ध होतील तशी पाठवावी. जानेवारी २००० मध्ये पुरस्कार जाहीर होतील.

पुस्तके पाठवण्याचा पत्ता– अ. भा. मराठी बालकुमार साहित्य संमेलन. एस. एम. जोशी हिंदी विद्यालय, १ फेअर रोड, गोळीबार मैदान, पुणे ४०. किंवा

शंकर सारडा, अध्यक्ष बालकुमार साहित्य संमेलन, द्वारा दैनिक देशदूत, ५९ नवी पेठ, शास्त्री रोड, पुणे ४११०३०.

## हेमिंग्वेची जन्मशताब्दी

विसाव्या शतकातील सर्वाधिक गाजलेल्या लेखकांमध्ये हेमिंग्वेचा समावेश होतो. नोबेल पुरस्कार विजेता लेखक अर्नेस्ट हेमिंग्वे यांच्या जन्मशताब्दी निमित्त अमेरिकेतील त्याच्या इडाहो या शहरी स्मृती सप्ताह पाळण्यात येणार आहे. २१ जुलै हा हेमिंग्वेचा जन्मदिवस. जुलै १९६१ मध्ये त्याने स्वतःवरच गोळी झाडून आत्महत्या केली. हेमिंग्वेच्या हस्तलिखितांचे, छायाचित्रांचे व पत्रव्यवहाराचे एक प्रदर्शन नॅशनल पोर्ट्रेट गॅलरीमध्ये भरविण्यात येत आहे. अमेरिकन साहित्यावरच नव्हे तर जगातील अन्य भाषांतील साहित्यावरही हेमिंग्वेचा ठसा उमटलेला आहे. अनेक लेखकांनी त्याचे अनुकरण करण्याचा प्रयत्न केला आहे; आणि त्याच्या पौरुषाच्या संकल्पनेचे कळतनकळत गुणगान केले आहे. पहिल्या महायुद्धात त्याने ॲम्ब्युलन्स ड्रायव्हर म्हणून भाग घेतला. त्या अनुभवावर त्याने कथा, कादंबऱ्या लिहिल्या. स्पॅनिश यादवी युद्धात तो लढला. 'फॉर हूम दि बेल टोल्स' ही त्यावरील कादंबरी स्वातंत्र्योत्सुक वसाहतवादी देशातील क्रांतिकारकांना प्रेरणादायक ठरली. पहिल्या महायुद्धात इटालियन आघाडीवर त्याला लागलेल्या एका शार्पनेलची त्याने अंगठी बनवून स्मृतीदाखल जपून ठेवली. या युद्धभूमीवर त्याला रेड क्रॉसची एक परिचारिका आग्नेस व्हॉन कुरोपस्की ही भेटली. 'ए फेअरवेल टू आर्म्स'मध्ये या प्रेमाची सगळी कहाणी आली आहे. युद्धवार्ताहर म्हणून दुसऱ्या महायुद्धात तो सामील झाला आणि स्पेनला शस्त्रास्त्रांचा पुरवठा करण्यासाठीही त्याने सहाय्य केले. 'ॲन ओल्ड मॅन अँड दि सी' या त्याच्या कादंबरीला नोबेल पुरस्कार मिळाला.

□

**श्रीपाद काळे**

ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाद रामकृष्ण काळे यांचे वाडा (जि. सिंधुदुर्ग) येथे दि. १८ जून रोजी वयाच्या ६८ व्या वर्षी निधन झाले. १४०० कथा आणि काही कादंबऱ्याही त्यांनी लिहिल्या. कोकण मराठी साहित्य परिषदेचा पुरस्कार त्यांना लाभला होता. प्राचीन संस्कृत साहित्य व ऋग्वेद यांचा विशेष अभ्यास त्यांनी केला होता.

**भास्करराव जाधव**

सात वर्षे चाललेल्या श्रमिक विचार दैनिकाचे संपादक, लाल निशाण पक्षाचे नेते भास्करराव जाधव यांचे दि. १८ जून रोजी निधन झाले. कामगार, दलित, श्रमजीवी यांचे प्रश्न धसाला लावण्यासाठी त्यांनी विपुल लेखन केले. अण्णा भाऊ साठे, अमरशेख यांचे ते भक्त होते. नगर येथे १९५९ पासून त्यांचे वास्तव्य होते.



## शब्दकोडे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रं | | व | झी | ळा | पा | झो | सी |
| ग | ग | पु | ल | व | पु | य | र |
| म | व | पं | इ | य | प्रे | स्व | |
| ना | | ष्टी | च | क | क | ची | क |
| चे | में | त्त | ए | मी | मा | ण | सं |
| ट | मि | सी | र | न | र्ट | पा | की |
| नि | ष्ट | खी | स | र्स | अ | चि | र्ण |
| फॅ | ही | वा | ट | ए | क | टी | ची |

सोबतच्या चौकटीमध्ये १६ पुस्तकांची नावे दडलेली आहेत. तसेच त्याच पुस्तकाच्या लेखकाच्या नावाची आद्याक्षरेही दडलेली आहेत. पुस्तकाची नावे व लेखकाची आद्याक्षरे ओळखा व कार्डावर लिहून पाठवा.

बरोबर उत्तर पाठवणाऱ्यांपैकी लॉट टाकून येणाऱ्या पहिल्या तीन स्पर्धकांना प्रत्येकी शंभर रुपयांची पुस्तके बक्षीस.

**उत्तरे पाठवण्याची मुदत– २० ऑगस्ट १९९९**

**आमचा पत्ता :** मेहता मराठी ग्रंथजगत १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०.

**बालकुमार पुस्तके, मासिके ओळखा.** **मे ९९ स्पर्धा निकाल**

**निकाल**

१) **शामची आई** २) **इसापनीती** ३) **छावा** ४) **चंपक** ५) **पंचतंत्र** ६) **तेनालीराम** ७) **फास्टर फेणे** ८) **कृष्णसुदामा** ९) **चांदोबा** १०) **कुमार** ११) **अक्षरबाग** १२) **चिंटू** १३) **गोट्या** १४) **किशोर** १५) **आनंद** १६) **चतुर बिरबल**

**यशस्वी स्पर्धक**

१) **अविष्कार भांडेकर–** २८६, सावित्री विहार, सोमलवाडा, वर्धा रोड, नागपूर - २५.


२) **गणेश नामदेवराव कांबळे** c/o नामदेव चं. कांबळे, चपराशी कॉलनी, अकोला रोड, वाशीम ४४४ ५०५.

३) **सायली सुधीर डकरे –** जाधववाडी, कोल्हापूर ४१६ ००५.

अभिनंदन! आपण आपल्या पसंतीची १०० रु.ची पुस्तके कळवावीत.

**आमचा पत्ता :** मेहता मराठी ग्रंथजगत १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०.

# पुस्तक परिचय




**कलावंत पितापुत्रांमधील भावबंधांचे प्रांजल चित्रण**

## वपु सांगे वडिलांची कीर्ती

**व. पु. काळे**

एका मनस्वी साहित्यकार पुत्राने आपल्या कर्तृत्ववान कलावंत पित्याचे वेगवेगळे पैलू दाखविणारे, वेळोवेळी लिहिलेले लेख संकलित करणारे हे पुस्तक दोघांच्या नात्याचे अनोखेपण प्रकट करते.

पुरुषोत्तम श्रीपत काळे. १ नोव्हेंबर १८८८ रोजी वाईजवळच्या मेपवली गावी जन्म. मेणवलीचा नाना फडणवीसांचा कृष्णाकाठचा वाडा अजूनही बघण्यासारखा आहे. त्यातील जुनी चित्रे आजही रसिकांना आकृष्ट करणारी आहेत. मेणवलीत बालपण, हैद्राबादला चित्रपटसृष्टीत नेपथ्यकार, प्रथम पत्नीच्या निधनाने दुसरे लग्न, वसंत या पुत्राचा जन्म (१९३२), १९३४ साली पुण्यात स्वतःचा बंगला. त्याला सात हजार खर्च आला. कर्जफेड १९५४ पर्यंत चालली होती.

१९४२ साली वयाच्या ५४ व्या वर्षी राजकमल कलामंदिरात कामाला लागले. पुण्याहून मुंबईला ये-जा करीत. महिन्या-दोन महिन्याने पुण्याला वीकएंडला येत. नेपथ्यकार म्हणून ते राजकमलमध्ये पडदे रंगविण्याचे काम करीत. त्या वेळी वपुंचे वय दहा. भावेस्कूलमध्ये इंग्रजी पहिलीच्या वर्गात. वपुंची बहीण सिंधू. पुश्रींची द्वितीय पत्नी ताई. तिच्या बहिणीचेही बिऱ्हाड त्याच बंगल्यात. ताई पुण्यातील बिऱ्हाडीच राहिल्या. पुश्री मुंबईला गेले तरी.



१९४६ मध्ये दादरला रानडे रोडवर पुश्रींना दोन खोल्यांची जागा जिवा- बिल्डिंगमध्ये मिळाली. पुण्यातील स्वतःच्या मालकीच्या प्रशस्त 'श्रमसाफल्य' या बंगल्यातून दोनशे चौरस फूटाच्या छोट्या जागेत राहणे ही एक कसरतच होती. परंतु त्यामुळे मुंबईत सर्व कुटुंबियांना एकत्र राहणे जमणार होते. राजकमलमध्ये आर्ट डायरेक्टर म्हणून त्यांची पदोन्नती झाली. त्या वेळी ते साठीत होते. व्ही. शांताराम यांनी त्यांच्या सत्काराच्या वेळी म्हटले, ''काळे अजून तरुण आहेत. या वयात तीस-तीस फूट उंच शिडीवर चढून ते बॅक ग्राउंडस् रंगवत असतात आणि मी मात्र त्यांनी रंगवलेल्या बॅक ग्राउंड्स खाली उभा राहून पाहत असतो.''

वपुंनी आपल्या वडिलांबद्दल या पुस्तकात भरभरून लिहिले आहे. वडिलांबद्दल लिहायचे म्हणून कसलेही दडपण मनावर न ठेवता लिहिले आहे. ते काही सलग चरित्र नाही. केवळ आठवणींचे संकलनही नाही. एक प्रकारचे स्वैर चिंतनच आहे. बाप-लेक या नात्यातले अनेक पदर त्यांनी उलगडून दाखवले आहेत. पुण्याला असताना वडील-अप्पा हे वपुंच्या वाट्याला महिन्यातून एखादा दिवसच यायचे. मुंबईच्या चाळीत मात्र एकाच खोलीत राहताना 'रूम पार्टनर' म्हणून वपुंना अण्णांचा नित्य सहवास लाभू लागला. एकदा आजारी असतानाही त्यांनी म्हटले, ''मला पडल्या-पडल्या पेंटिंग करता येईल, असा एक स्टँड बनवून दे.'' १९६२ पासून ते पुन्हा पुण्याला राहायला गेले. ७४ व्या वर्षापर्यंत त्यांनी नेपथ्य रचनेचे काम केले.

''अण्णांचा कर्मयोग हा निष्काम आहे, त्यांनी केलेल्या श्रमाचं चीज होत नाही; पंच्याहत्तरीतही त्यांचे कष्ट संपलेले नाहीत. व्यवहारात ते सतत फसतच राहिले. परिश्रमाबरोबर व्यवहारात फसणं हा त्यांचा स्थायी भाव आहे'' असे वपुंना वाटते. ''परंतु हा व्यवहार सांभाळू पाहणारे आम्ही सर्व हरलेलो आहोत आणि अण्णा जिंकलेले आहेत. व्यवहार सांभाळूनही आम्हाला जी मनःशांती लाभली नाही, ती अण्णांना कधीच प्राप्त झाली आहे,'' असेही वपुंना वाटते. कष्टांचा हिशेब न ठेवता कष्ट करायची सवयच जणू त्यांना होती.

अण्णांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि आवडीनिवडीचे अनेक पैलू वपु नोंदवतात. अण्णांची स्मरणशक्ती अचाट. केवळ स्मरणाने त्यांनी लहानपणी शाळेत अभ्यासलेल्या सव्वाशेच्या वर कविता एका वहीत लिहून दाखवल्या. अल्बम करण्याचा त्यांचा छंदही अफलातून. स्वतःच्या लेखांचा अल्बम. प्रकाशित-अप्रकाशित चित्रांचा अल्बम. स्वतःला आवडलेल्या कलाकृतींचा अल्बम. वृत्तपत्रीय लेखांच्या कात्रणाचे अल्बम. अल्बम म्हणजे एक प्रकारे ज्ञानाचा संग्रह करण्याची शिस्त. देशस्थ या उपाधीला बदनाम करणारी शिस्त त्यांच्यात होती. (पृष्ठ ९०) वपुंची पहिली कथा १९५२ साली धनुर्धारीच्या दिवाळी अंकात आली. तर पुश्रींनी वपुंना 'इलस्ट्रेटेड वीकली'च्या आकाराचा एक अल्बम भेट दिला. ''पहिलीवहिली कथा आज संग्रहित केली आहे. त्याच्या हातून उत्तरोत्तर अशीच वाङ्मयसेवा घडो. हा आशीर्वाद सफल

होवो.''

त्याचप्रमाणे १९०८ सालापासून अण्णांनी नित्यनियमाने दैनंदिनी लिहिण्याचा परिपाठ जारी ठेवला. नाट्यसंगीत, क्रिकेट, नाटके यांचीही त्यांना गोडी होती.

राजकमलमध्ये आर्ट डायरेक्टर म्हणून सुतारखाते, मोल्डिंगखाते याच्याशी संबंध. त्यामुळे त्यांना जुन्या शेडमध्येच काम करावे लागे. शेजारच्या शेडमध्ये रामचंद्र हा हत्ती. त्या हत्तीशी अण्णांची दोस्ती जमली. अण्णा त्या हत्तीला रोज एक पोळी देत. तोही रोज दुपारी एक वाजता आपली सोंड अण्णांच्या शेडच्या खिडकीशी नेई आणि हक्काने पोळी घेई. (३७)

अण्णा कपड्यांच्या बाबतीत बेफिकीर असत. कपडे शिवणे म्हणजे महान योग. त्यांच्या नवीन कोटावर ताई शेरेबाजी करीत असे. ''चित्रकार आहेत पण वाटेल त्या रंगाचे विटके कोट शिवतात.'' (४९)

ब्रह्मदेवाला काटकसरीची सूचना, बरिदुल्ला अथवा शांतीची गोष्ट, शिव्या देण्याची कला वगैरे त्यांचे विनोदी उपहासगर्भ लेख बक्षीसे मिळवून गेले. उपहासगर्भ विनोद हा त्यांच्या स्वभावाचा स्थायी भाव आहे. आपल्या काळ्या वर्णावरही ते विनोद करीत. एकदा त्यांना के. नारायण काळे यांचा कुत्रा चावला. त्यावर त्यांनी लेख लिहिला. लेखाचे नाव होते, ''गोऱ्या काळ्यांचे काळे कुत्रे काळ्या काळ्यांना चावले.''

१९२१ ते १९३७ या काळातला ललितकलादर्श नाट्यसंस्थेचा इतिहास त्यांनी लिहिला. त्या पुढचा ६७ पर्यंतचा इतिहास वपुंनी लिहिला.

१९०८ पासूनच्या डायऱ्यांमधून वपुंनी संशोधन करून काही मजेदार आकडेवाऱ्याही दिलेल्या आहेत–

(१) एकूण ४२ नाटकांसाठी ७८ हजार चौ. फूट मांजरपाट रंगवले.

(२) २१ चित्रपटांसाठी ५४ हजार चौ. फूट मांजरपाट रंगवले.

(३) बारीक-सारीक पडदे व बॅकग्राउंडचा समावेश या आकड्यात नाही. १९७३ साली पुश्रींना विष्णुदास भावे सुवर्णपदक मिळाले.

२८ सप्टेंबर १९७६ रोजी वयाच्या ८८ व्या वर्षी पुश्रींचे देहावसान झाले. शेवटी शेवटी त्यांना भास होत. मेंदूला अपुरा रक्त पुरवठा होत असल्याने म्हणे असे भास होत. संगीताची कुठेतरी बैठक चाललेली आहे, विशिष्ट चीज म्हटली जात आहे इत्यादी. मानसोपचार तज्ज्ञ डॉ. शिरवईकर म्हणाले, ''तुमचे वडील भ्रमावस्थेत इतरांची दया येऊन पैसे फेकतात. असा पेशंट मी प्रथमच पाहतोय. ही इज क्वाएट ॲन इनोसंट मॅन. मला नव्या ट्रीटमेंटचा विचार केला पाहिजे.'' ''नोकरी आली आहे. पडदे करायचे आहेत. चिंता मिटली. पाच हजार पगार ठरलाय.'' असे ते या भ्रमावस्थेत पुनःपुन्हा घोळत राहत. त्यांच्या मृत्यूनंतर पिंडाला कावळा शिवला नाही. याची खंत वपुंना वाटते. अलिप्त वृत्तीने ते जगले. आपली इच्छा त्यांनी कधी व्यक्त केली नाही. ''कोणत्या मुक्कामावर तुमचा जीव गुंतला होता ते समजलं नाही.'' अशी बोचणी त्यामुळे लागून राहिलेली आहे.



त्यांच्या घराच्या ठिकाणी आता श्रमसाफल्य अपार्टमेंट्सची इमारत उभी आहे. घरासमोरच्या गल्लीला नेपथ्यकार पु.श्री. काळे पथ असे नाव देण्यात आले आहे.

हे पुस्तक प्रथम प्रसिद्ध झाले ७३ साली. त्या वेळी पुश्रींचे वय होते ८४. पु. ल. देशपांडे यांनी प्रस्तावनेत म्हटले आहे, ''ते वसंताचे वडील आहेत. पण आम्हां सर्व नाटकवाल्यांना पितृतुल्य वाटणारे आमचे आप्त आहेत... वसंताला त्याच्या अण्णांचा स्नेह लाभला. ते त्याचे रुम पार्टनर होऊ शकले... आपल्या चिमुकल्या कुटुंबाला चारा-पाणी आणण्यासाठी पुण्यातल्या टुमदार बंगल्यातून सतत मुंबईच्या फेऱ्या करणारा हा कुटुंबप्रमुख घरातल्या सानथोरांचा मित्र आहे. मर्यादा सांभाळून लेक आणि सून त्याची थट्टा करू शकते... अण्णा काळे कलावंत आहेत हे फक्त त्यांच्या कलाकृतींकडे पाहून कळते. इतर वेळी कुठल्याही चार सभ्य माणसांसारखे ते दिसतात... ८४ व्या वर्षी अण्णा ज्या उत्साहाने रंगवितात त्याकडे पाहिले तर विशीतल्या वृद्धांनाही आश्चर्य वाटेल. ऐंशीच्या घरात असताना अण्णांनी पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरासाठी महाल, जंगल वगैरे पडदे रंगवले आहेत. पडदे रंगविण्याची त्यांची स्वतःची शैली आहे. काळ्यांनी पडद्याला टाळी घेतली आहे. त्यांच्या रेखनाइतकाच त्यांच्या लेखनाचा मी चाहता आहे... काळ्यांचा हात हळुवारपणे कॅनव्हासवर फिरतो, लेखणी घेऊन कागदावर फिरतो आणि तितक्याच हळुवारपणे स्नेह्यांच्या पाठीवरूनही फिरतो.''

पुलं प्रमाणेच पुश्रींच्या कलेची प्रशस्ती अनेकांनी केलेली आहे.

वपुंनी वर्णिलेली ही वडिलांची कीर्ती त्यामुळेच अनाठायी वाटत नाही, खोटी वाटत नाही. दोन कलावंतांमधील नात्याची ती एक प्रांजल कैफियत वाटते.

पृष्ठे १३६, सत्तर रुपये, ग्रंथजगतच्या सभासदास ५३ रुपये.

□

## अभिनंदन!

महाराष्ट्र साहित्यपरिषदेतर्फे दरवर्षी कादंबरी या वाङ्मयप्रकारास देण्यात येणारा ह. ना. आपटे पुरस्कार यावर्षी सौ. आशा कर्दळे यांच्या विदेश पुस्तकास मिळाला आहे. त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन!



**सगळ्या अपुऱ्या आशा-आकांक्षा जेथे पूर्ण होतात.**

## फँटसी : एक प्रेयसी

व. पु. काळे यांच्या काही प्रासंगिक आणि स्फुट लेखांचा 'फँटसी-एक प्रेयसी' हा संग्रह. यातील विविधता लक्षणीय आहे. लता मंगेशकर यांना मुंबई महापालिकेतर्फे मानपत्र देण्यात आले. महापौरांनी सांगितले म्हणून तसे मानपत्र व.पु.काळे यांनी लिहिले. परंतु त्या वेळच्या महापौरांना ते आवडले नाही. ते मानपत्र या पुस्तकात वपुंच्याच हस्ताक्षरात आले आहे. त्याचप्रमाणे आपल्या कन्येविषयीच्या भावनाही काही छायाचित्रांच्या टिकाटिपणीद्वारे त्यांनी व्यक्त केल्या आहेत. त्याही त्यांच्या हस्ताक्षरात छापलेल्या आहेत. कन्या पतीच्या घरी निघाली तेव्हा वपु लिहितात–

"तू पतीच्या घरी तर निघालीस. होय, जायलाच हवं. पिता आणि पती. एक रेघ आणि एक वेलांटी इकडची तिकडे. तरीही वाटतं, पती होणाऱ्या प्रत्येक पुरुषाला पिता होणं जमेल का? कन्यादान करताना प्रत्येक पिता मूक होतो. कदाचित तो जावयाला सांगू शकत नसेल की, बाबा रे, माझ्या मुलीचा तू पतीच आहेस; तरीही संसारात तिचा पित्यासारखा सांभाळ करशील का?"

इतर लेखांमध्ये अनेक विषय आले आहेत.

आयडियल बुक सर्व्हिसचे वामनराव नेरूरकर–(कांताशेठ) यांना उद्देशून एक पत्र आहे. आयडियल म्हणजे वामनराव हे समीकरण रूढ आहे. वामनराव सतत दुकानात काउंटरमागे उभे. त्यांना तेथून बाहेर काढणे प्रत्यक्ष गजाननालाही जमणार नाही. पुस्तकाचं दुकान. पुस्तक पंढरी हीच त्यांची चौपाटी, माथेरान, महाबळेश्वर, स्वित्झर्लंड. आयडियल हा त्यांचा व्यवसाय नाही. धर्म आहे. माणसांच्या सहवासापेक्षा पुस्तकांचा सहवास त्यांना जास्त प्रिय आहे. माणसं माणसांना माणसातून उठवतात. पुस्तकं माणसाला सामावून घेतात. "तुमच्या दुकानातील हजारो पुस्तकांनी तुम्हाला आपलं मानलंय. तुम्ही दुकानात नसलात की ती पोरकी



होतात." असं वपु म्हणतात.

डॉ. भाल पाटील यांचा मुलगा पराग हा आकस्मिक रीत्या मृत्यूमुखी पडतो. तो तीन वर्षांचा असताना त्याची आई डिससेमिनेटेड स्क्लेरोसिसला बळी पडते. तिची जागा घेणारी वत्सल नलिनी पुढे येते. परागची प्रगती चांगली होत राहते. पण पुढे तोही एका शस्त्रक्रियेत मरतो. एक डॉक्टर, एक लोकप्रिय नगरसेवक, एक हळवा पती, एक वात्सल्यभावानं दक्ष असलेला बाप असे अनेक माणुसकीचे पदर असलेल्या डॉ. भाल पाटलांना त्याच्या मृत्यूचा धक्का बसतो. परागला उद्देशून त्यांनी एक पुस्तक लिहिले. त्या पुस्तकाच्या संदर्भात वपुंनी लिहिलेले पत्र या पुस्तकात आहे. "पराग गेला. तुमच्या आक्रोशापल्याड गेला. आयुष्याची ही सर्वात मोठी शोकांतिका. सर्वात प्रिय व्यक्तीच्या वियोगानंतर फोडलेला टाहो, फक्त तीच व्यक्ती सोडून सगळं जग ऐकतं. त्यापैकी एकाच्याही सांत्वनात संजीवनीची शक्ती नसते आणि विस्मरण घडवणारं मंत्रसामर्थ्य नसतं. ही नियतीचीच योजना आहे. त्यानं केलेली व्यक्ती पुन्हा त्याच्या माणसात जाऊ नये म्हणून केलेली." असे ते सांत्वन करतात.

बडोदा येथील साहित्य संमेलनाचे अध्यक्षीय भाषणही यात आले आहे. लेखक म्हणून झालेल्या आपल्या वाटचालीचा आढावा त्यांनी त्यात घेतला आहे. अनेक नातलगांचे अनुभव सांगून, लेखनाला आपण कसे प्रवृत्त झालो हे स्पष्ट केले आहे. "लेखनाचा सूर अद्यापि गवसलाय असे नाही. मी ज्यांना लेखक मानतो ती मंडळी वेगळीच आहेत. मला साहित्यिक व्हायचं नाही. आणखी मोठा लेखकही व्हायचं नाही. मी स्वतःला आजही लेखक मानत नाही. मला एक माणूस व्हायचं आहे. कालच्यापेक्षा जास्त मोठा माणूस आज, आजच्यापेक्षा मोठा माणूस उद्या... स्वतःचे अनुभव सांगण्यासाठी मी एके दिवशी लेखनाला प्रारंभ केला. माझ्या त्या काळातल्या छोट्या-छोट्या व्यथांना, संघर्षांना लघुकथेचं माध्यम जवळचं वाटलं... मनातलं वादळ शमविण्यासाठी शब्दांची मदत होऊ शकते. याचा शोध अवर्णनीय होता. कथेचं माध्यम स्वीकारलं कधी हेही समजलं नाही. पण ते आत्मनिवेदनाला जवळचं वाटलं... त्या दृष्टिकोनातून माझ्या साहित्यात मी इतका उतरलोय की त्यापलीकडे मी आता उरलेलोच नाही. माझं वैयक्तिक आयुष्य माझ्या साहित्यापासून लांब नाही..."

असं हे अगदी अनौपचारिक भाषण आहे.

'फँटसी– एक प्रेयसी' या लेखात फँटसी या साहित्य प्रकाराची वैशिष्ट्ये टिपली आहेत. "चमत्कृती गौण, आशय वेधक, आचार-विचारातील विसंगतीवर नेमके बोट ठेवण्यासाठी, फँटसीचा उपयोग होतो. ती सर्कशीतल्या विदूषकासारखी असते. विदूषकाला विदारक सत्य सांगण्याचा एक वेगळा अधिकार असतो. ते सांगताना त्याला कुणाचीही टोपी उडविण्याची मुभा असते. कारण विदूषकाचा किंवा फँटसीचा रोख व्यक्तीवर नसतो, वृत्तीवर असतो."

फँटसी हा आपला विसावा आहे. उदास मनःस्थितीवरचा उतारा आहे. लेखनाच्या

दिगन्ताच्या प्रवासातली सावली आहे. फँटसीच्या राज्यात मला हवं ते सगळं घडू शकतं. ते घडविण्यासाठी कधी परीकथेतली परी माझ्याशी संसार करून जाते. कधी कॅलेंडरमधली बाई साकार होते...''

मन उद्ध्वस्त करणारे अनुभव पचवण्याचे सामर्थ्य फँटसीनेच दिले आहे, असे वपु मानतात. आयुष्यातली विस्कटलेली सुखं मला सुख विकण्याच्या दुकानात गवसतात. आशा, आकांक्षा, स्वप्नं या सगळ्या गोष्टी, अतृप्त इच्छा मला फँटसीच्या राज्यात पुऱ्या करता येतात. मीच माझा कर्ता करविता असतो. वास्तवतेचं भान ठेवायचं असतं. बाऊ करायचा नसतो, असे ते सांगतात. तथापि फँटसी एखाद्या प्रेयसीप्रमाणे रुसते आणि सगळेच लेखन ठप्प होते अशीही तक्रार वपु करतात.

वपुंच्या ठेवणीतल्या अशा काही चिजा वाचताना, आपण त्यांच्या सहवासात असल्याचा आणि त्यांचे बोलणे खास आपल्यासाठी चालू असल्याचा भास होतो. तो अर्थातच चांगला आनंददायक असतो.

पृष्ठे ११२, ऐंशी रुपये, ग्रंथजगतच्या सभासदास ६० रुपये.

□

**पुस्तकातील मित्र ओळखा.** **मे ९९ स्पर्धा निकाल**

**निकाल**

१) **दिनारजादी– अरेबियन नाईटस् २) चेंडू–चेंडूच्या फिरक्या ३) लोलो–लोलो फुलली, तुम्ही फुला ४) मितू– प्यारेदादा ५) एडिसन– कथारूप वैज्ञानिक ६) युक्लिड– कथारूप वैज्ञानिक.**

**यशस्वी स्पर्धक**

**१) सरिता द. शेंडगे–** मु.पो. शिपोशी, ता. लांजा, जि. रत्नागिरी.


**२) श्रेयस किशोर बरबरे** ३१८, ब्राह्मण गल्ली, भिंगार, अहमदनगर ४१४००२.

**३) योगिनी रामचंद्र साने –** ए/५, पंचवटी विहार, ६९ रामाचा गोट, मंगळवार तळ्याजवळ, सातारा-४१५००२.

अभिनंदन! आपण आपल्या पसंतीची १०० रु.ची पुस्तके कळवावीत.

**आमचा पत्ता :** मेहता मराठी ग्रंथजगत १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०.





**माणूसवेड्या माणसाने जमवलेली रंगतदार मैफल चिअर्स**

## चिअर्स

चिअर्स म्हणून मैफलीला आरंभ केला की तिचा रंग मदहोश होता जातो. विख्यात कथाकथनकार व. पु. काळे अशा मैफली रंगवण्यात मातबर आहेत. मैफल रंगवायला माणसेही जबरदस्त लागतात. वैचित्र्यपूर्ण आयुष्य जगलेली, जीवनातले नाट्यपूर्ण चढ-उतार बघितलेली, खूप काही भोगलेली. सोसलेली. एरवीही माणसे आपल्या अनुभवाचे भांडार आपल्या मनाच्या गाभाऱ्यात ठेवून त्याची हळुवारपणे जपणूक करीत असतात. परंतु एखाद्या मैफलीत, दोन-चार पेग अंगांगात रिचल्यावर, थोडी फार बंधनमुक्त होतात आणि आपल्या त्या अद्भूतरम्य जंगी खजिन्यातल्या काही चित्रांची चुणूक दाखवण्याएवढी मोकळी होतात. असे मोकळे झाल्यावर मग मैफलीला बहार येते. अज्ञातावरचे आवरण दूर होते आणि मानवी मनाच्या गहन गूढतेचे अलौकिक दर्शन घडते.

व.पु. काळे अशा या लौकिकातील अलौकिकाचे दर्शन घेण्यात रमतात आणि असे काहीतरी दिव्य भव्य समोर आल्यावर नतमस्तक होतात. आपल्या त्या अनुभवात ते मग आपल्या वाचकांनाही कधी कधी सामील करून घेतात. 'चिअर्स' असे म्हणून, अनुभवाचा चषक उंचावून ते आपल्याला अशाच एका मैफलीत मनःपूर्वक सामील करून घेत आहेत.

रसिकराज रामभूय्या दाते, जिंदादिल शायर– भाऊसाहेब पाटणकर, जाज्ज्वल्य हिंदुत्व निष्ठा जपणारे पु.भा.भावे अण्णा, शोधून न सापडणाऱ्या आणि मागून न मिळणाऱ्या आयुष्याचा जमेल तसा डाव मांडणारे गीतकार सुधीर मोघे, झोपेचा वेळ सोडला तर अखंड पुस्तक विक्रीचे व्रत चालवणारे आयडियलचे कांताशेठ नेरूरकर, तुम्हाला गाफील ठेवून तुमचा नेमका मूड कुशलतेने टिपणारे छायाचित्रकार राजदत्त, संगीतकारांच्या हुबेहुब नकला करणारे नकलाकार वि.र. गोडे, कुटुंबाच्या गरजा संपल्या की कर्तापुरुष कुटुंबाचं देणं लागत नाही; त्यानं चार

भिंतीच्या बाहेर पडायला हवं तरच तो मोठा होईल, असे सांगणारे आणि त्याप्रमाणे वागणारे डॉ. श्रीखंडे, आपल्या हातचलाखीने बघता बघता हातातला रुपाया गायब करून चकित करणारे जादूगार अशोक अशा माणसांना 'चिअर्स' म्हणून मैफलीत आणून वपुंनी या मैफलीचा थाट खुलविला आहे. इतरही माणसांना वपुंनी या मैफलीत सामील करून घेतले आहे. त्यात इंदूरचे ज्योतिषी अण्णा पुराणिक आहेत. या पुराणिकांनी बॅ. महमद अली जीना यांनाही आपल्या ज्योतिषशास्त्राच्या बळावर काबीज केले. मोरारजीभाईंनी मुख्यमंत्री असताना सचिवालयातील कार्यालयात बोलावले तेव्हा ''माफ करा. लाखो रुपये खर्च करून बांधलेल्या इमारतीत देशाच्या भवितव्याचा विचार करायचा, स्वतःचा नव्हे.'' असे त्यांना सुनावण्याएवढा परखडपणाही अण्णा दाखवतात आणि 'अपॉइंटमेंट शिवाय मला कुठल्याही दिवशी सकाळी चहाच्या वेळी भेटू शकता' असा कायमचा पास मिळवून ठेवतात. 'हे अण्णा मैफलीच्या बादशहांचे बादशहा असतात. वेळ, काळ, रात्र, दिवस, वय, वर्ष कशाचाही हिशेब नसतो. वपुंच्या इंदौरच्या ट्रिपा अण्णांमुळे संस्मरणीय होतात आणि इंदौरच्या स्वागताच्या एकूणच खानदानीपणाच्या गोष्टी सांगण्यात मशगुल होतात. वपुंची कुंडली ते मागतात.

वपु त्यांना सांगतात, ''अण्णा, तसा खूप गोष्टींचा कंटाळा आलाय. नोकरी, दौरे, लेखन, कथाकथन सगळी पळापळ फुकट आहे. सगळं चांगलं असून वैयर्थाची भावना छळत राहते. केव्हातरी हे सगळं थांबायला हवं. एकदम वेगळा, चिरंतन प्रवासाचा ट्रॅक हवाय.''

त्यावर अण्णा सांगतात– ''तुमचा कर्केचा गुरू आहे. रास तूळ आहे. वैराग्याचा सूर कायमच राहणार. काहीही करायचं नाही. काहीही सोडायचं नाही. जुनं सगळं करता करताच नवं सापडेल. वयाच्या तिसऱ्या-चौथ्या वर्षी आपण प्रथमच श्री गिरवतो. ती श्री इतिश्री होईतो राहतेच की नाही?''

'चित्रलेखा' नाट्यसंस्थेचे अध्वर्यू मोहन वाघ हे उत्तम छायाचित्रकारही आहेत. वपुंनी मोहन वाघ आणि पंजा नामक मासिक चालवणारा खराखुरा वाघ यांच्यातील सामना घडवून आणला आहे. या खऱ्याखुऱ्या वाघाला वाघीण नावाच्या नव्या मासिकासाठी मुखपृष्ठावर टाकण्याकरिता चित्र हवे आहे. संपूर्ण विवस्त्र अवस्थेतील चित्र वाटायला हवे आणि ते काढायला आपले सोज्ज्वळ मोहन वाघ तयार होत नाहीत. वाघांच्या रानटी दुनियेत वाघ मादीने कपडे घालणे हीच अश्लीलता समजली जाते. त्यामुळे डोक्यावरून पदर घेतलेला, हातात तबक असलेला नटीचा फोटो बघून हा पंजा मासिकाचा संपादक गर्जना करीत ओरडतो, ''तुम्ही सभ्य आहात असं समजत होतो. पण तुमच्याजवळ एवढा घाणेरडा फोटो?'' आणि तो सरळ मोहन वाघांवर उडी घेतो.

अर्थात दोन वाघांची ही सगळी मुलाखत स्वप्नात होते असे दाखवून व.पु. काळे वाचकांना (आणि मोहन वाघांनाही) वाचवतात– हे अलाहिदा! नाहीतर मोहन वाघांना 'ऑल



दि बेस्ट' किंवा 'रणांगण' सादर करण्याची संधी कशी लाभली असती?

जिंदादिल शायर भाऊसाहेब पाटणकर यांच्यावरचा या पुस्तकातला लेख सर्वात जास्त लांबीचा आहे. त्यात अनेक शेरही उद्धृत केले आहेत.

**दुर्लक्षिले जेव्हा आम्ही साहित्यिकांना या अशा**
**मैफलीही जागजागी रंगल्या जेव्हा अशा**
**जेव्हा कुठे कीर्ती प्रियाही हासूनी आली पुढे**
**नुसतीच ना आली तशी गालही केला पुढे.''**

असा भाऊसाहेबांचा अनुभव. वपुंना ते समानधर्मी वाटावेत यात नवल काय?

'चिअर्स' मधील सर्वात वाचनीय लेख कुठला असा प्रश्न पडला तर त्याचे उत्तर मिळेल– 'निगुडकर.' तुम्हाला प्रश्न पडेल हे काय प्रकरण आहे? हे नाव तर काही आमच्या परिचयाचे नाही. मग या व्यक्तीवरचा लेख सर्वात वाचनीय असे का म्हणताय?...

निगुडकर म्हणजे वपुंच्या सौभाग्यवती. आता कोणीही पुरुष आपल्या बायकोवर लिहितो तेव्हा तो मजकूर वाचनीय असणारच! तर वपु कधीकाळी म्हणे घरोघर जाऊन साड्या विकण्याचा व्यवसाय करीत होते. त्यात या 'निगुडकर' ची गाठ पडली. ती म्हणे रोज एक साडी ठेवून घ्यायची आणि दुसऱ्या दिवशी हिचा रंग पसंत नाही, म्हणून दुसरी साडी बदलून घ्यायची. असा हा सिलसिला दीर्घकाळ चालू राहिला. वपुंनाही तिच्या घरी राजरोस रोजरोज जायला निमित्त मिळत राहिले. तिचे भाऊ डोळ्यांत तेल घालून पहारा करीत असतानाही वपुंनी हा किल्ला सर केला.

''निगुडकर वस्तादच. लग्न होईतो निगुडकरांच्या नावानं एकाही साडीसाठी आम्हाला पावती फाडता आली नाही'', वपु कबुली देतात.

निगुडकर म्हणे, ''मी यांच्या केसावर भाळले.''

वपु म्हणत, ''मी हिच्या गाण्यावर भाळलो.''

कालांतराने वपुंचे केस गेले; निगुडकरचे गाणेही गेले.

अशा खूप गमती-जमती या लेखात आहेत. वपु स्वतःच्या फिरक्या घेत त्या सर्व सांगतात.


वपुंना-निगुडकरला सून येते; नातवंडांची चाहूल लागते. सव्वीस वर्षांच्या सहवासाने एकमेकांचे स्वभाव सही न् सही समजले आहेत. असे कोणालाही वाटते. पण निगुडकर बोलून जाते, ''तुमच्या काळ्यांच्या घरात टिकणं ही एक अवघड गोष्ट आहे.''

सव्वीस वर्षे काळ्यांच्या या घरात राहूनही 'तुमचं काळ्यांचं घर' ही भाषा उरतेच.

'चिअर्स'ची झिंग थोडीफार उतरायलाही अशी काही निरीक्षणे उपयोगी ठरतात.

चिअर्स : व.पु. काळे

पृष्ठे १५०. सत्तर रुपये, ग्रंथजगतच्या सभासदास ५३ रुपये.




आपापल्या जीवनमूल्यांना
कवटाळून ताठ कण्याने
जगू पाहणाऱ्या व्यक्ती

## मोडेन पण वाकणार नाही–

सुंभ जळतो-पीळ उरतो, निगेटिव्ह, पंगू, पराधीन आहे जगती, खेळणी, जलधारा, पाळ्या, पपा अशा आठ कथांचा 'मोडेन पण वाकणार नाही' या पुस्तकात समावेश आहे. या आठही कथांतून लोकविलक्षण अशा जिद्दी व्यक्तींची जीवनशैली चितारण्यात आली आहे. स्वतःच्या मतप्रणालीचा आग्रह धरणारी, आपल्या हट्टाच्या पूर्ततेसाठी इतर सर्वांना धुडकावून लावणारी, पण माघार न घेणारी अशी माणसे वपुंना आवडतात आणि त्यांना समजावून घेण्याची जिद्द आणि चिकाटी ते दाखवितात.

एखाद्याच्या रक्तातच वेगळेपण असते. जिद्दीने पेटणे हाच त्याचा स्थायी भाव असतो. एकाकी राहून झगडत राहण्यातच त्याला समाधान मिळते. अशी माणसे मरतात. पण मागे हटत नाहीत. जिवावर उदार होऊन ती जगत असतात.

दहा वर्षांत एकदाही रजा न घेतलेल्या आणि लेटमार्क नसलेल्या एकाला दहाच मिनिटे उशीर झाला म्हणून प्रथमच लेटमार्क पडतो. हा लेटमार्क काढून टाका म्हणून तो हेडक्लार्कला सांगतो. हेडसाहेबांकडे जातो, ते दाद देत नाहीत, तेव्हा तो ऑफिस समोरच्या फूटपाथवर झाडाखाली प्राणान्तिक उपोषणाला बसतो. अकराव्या दिवशी त्याची तब्येत अगदी बिघडते. त्याच्या बायकोच्या सांगण्यावरून रघुनाथ वर्तक हा गृहस्थ निरनिराळ्या ऑफिसर्सना भेटतो. अठरा दिवस जातात; तेव्हा रघुनाथ उपोषण करीत असणाऱ्या व्यक्तीच्या मोठ्या भावाला भेटतो. तो एका नटीच्या घरी राहत असतो. बिनपगारी नोकरी करीत कुत्र्याचं जिणं जगणारा तो भाऊ प्रत्येक कॉन्ट्रॅक्टमध्ये थोडीफार रक्कम कमिशन म्हणून काढून साठवत असतो. स्वतःचे पिक्चर काढायचं स्वप्न बघत असतो, त्याच्याजवळ धाकट्या भावाला देण्यासाठी मात्र पैसे नसतात.

व. पु. काळे या हकीगतीतील दाहकता आणखी गडद करतात. पंचविसाव्या दिवशी धाकटा भाऊ उपोषणातच मरतो. त्याच्या दुसऱ्या दिवशी त्यास लेटमार्क माफ केल्याचे पत्र मिळते.

सहा वर्षे झाल्यानंतर मोठा भाऊ नोटांनी खच्चून भरलेली बॅग धाकट्या वहिनीकडे घेऊन जातो. पिक्चर काढणं जमणार नाही हे त्याला कळलेलं असतं. वहिनी म्हणते, ''भाऊजी, थांबा! ती बॅग उचला. ते विष या घरात नको. सहा वर्षांपूर्वी यातील एक नोट मिळाली असती तरी ती लाखाच्या ठिकाणी होती. नको असताना घरात येणारा पैसा विषच असतो. आता दारिद्र्य मी पचवलं आहे. दारिद्र्य कसं उपभोगायचं ते मला समजलंय.''

हे दोघे भाऊ आणि वहिनी तिघेही विक्षिप्तच! प्रत्येकाचा स्वभाव जिद्दी!

'निगेटिव्हज'मधील सुचित्रा फोटोग्राफर रवीन्द्रबरोबर फिरते, मजा करते; पण ती लग्न करते श्रीमंत घारपुऱ्यांशी. घारपुरे रवीन्द्रला फोटो स्टुडिओसाठी भांडवल देतात. सुचित्रा त्यात पार्टटाईम काम करू लागते. रवीन्द्रजवळ तिचे काही विशिष्ट पोझमधील फोटो असतात. त्याच्या निगेटिव्हज मिळवण्यासाठी सुचित्रा सतत त्यांचा शोध घेते; आणि शेवटी स्टुडिओलाच आग लागते. रवीन्द्र तिला त्या फोटोंच्या निगेटिव्हज देऊन सांगतो. ''या चार निगेटिव्हजसाठी तू जंग जंग पछाडलेस, स्वतःच्या संसाराला आग लागू नये म्हणून तू अनेकांच्या संसाराला आग लावलीस... तुझं वाटोळं करायचं असतं तर मी तुझी पहिली रात्रही उगवू दिली नसती. पण मला तसं काही करायचं नव्हतं. आणि नाही पण!''

त्या निगेटिव्हजसाठी सुचित्रा कोणत्या थराला जाते हे पाहून आश्चर्य वाटते.

मोहिनी गोडबोले दिसायला सुंदर; पण तिच्या पायात व्यंग असते, त्यामुळे तिच्या लग्नात अडथळे येतात. बहात्तर नकार तिला मिळतात. साठे यांच्याशी तिचे लग्न ठरलेय कळल्यावर त्याने 'सुमित्राला पूर्वी प्रेमाच्या आणाभाकाही घेऊन, नंतर नकार दिल्याने तिला आत्महत्या करावी लागली,' ही हकीगत सांगायला साठेचा पूर्वाश्रमीचा मित्र मोहिनीकडे जातो. ती त्याला सुनावते, ''मी पायानं लंगडी आहे. तुम्ही मला नकार दिलात. तुम्ही मनानं लंगडे ठरलात. मला माझा शारीरिक पंगूपणा नडला नाही तेवढा तुम्हाला तुमचा मानसिक पंगूपणा नडला.''

''साठे यांनी मला सगळं सांगितलंय. मोहापुढे वाकायची वेळ आली तेव्हा मी वाकलो असं सांगणारा पुरुष मला भेटला. त्याच्याजवळ लपवाछपवी नाही. म्हणून तुम्ही लग्नाला या. मित्र म्हणून, हितचिंतक म्हणून.''

सर्वसामान्य माणसाचं मानसिक पंगुत्व वपु 'पंगू' या कथेत अशा प्रकारे मांडतात.

नानासाहेब देशमुखांनी लग्नाआधीच एका स्त्रीशी केलेल्या जवळिकीतून जन्मलेल्या वीणाला अठरा वर्षे अनाथाश्रमात काढावी लागतात. अठराव्या वर्षी तिला ते घरी न्यायला येतात, तेव्हा वीणा विचारते, ''घरी माझी ओळख काय देणार?'' ते म्हणतात, ''माझी

मुलगी म्हणूनच घरची सर्व माणसे तुला स्वीकारतील. माझी दोन्ही मुलं, पत्नी, आई तुझं स्वागत करायला उत्सुक आहेत. इतके दिवस तुला घरी नेऊ शकलो नाही, कारण माझे वडील हयात होते. त्यांना ही गोष्ट सांगण्याचे धाडस माझ्यात नव्हते.''

वीणा त्यांच्याबरोबर घरी जाते. तिचे यथास्थित स्वागत होते. तिला स्वतंत्र खोली देण्यात येते. देशमुखांच्या पत्नीला ती आई म्हणते, पण त्यांना 'पपा' अशी हाक ती मारू शकत नाही. ती कॉलेजला जाते, तिला कार मिळते. ती एम. ए. होते. तिचे एका प्राध्यापकाशी लग्न ठरते. देशमुख तिचे लग्न थाटामाटात करून देतात. वीणाने आपल्याला पपा अशी हाक मारावी एवढीच त्यांची इच्छा असते; पण वीणा ती इच्छा पूर्ण करीत नाही. आश्रमातील गुरुजी नंतर तिला सांगतात की, देशमुख हे तिचे वडील नव्हते; परंतु त्यांची पत्नी ही तिची खरी आई आहे. देशमुखांचे वडील वारल्याने तिने नवऱ्याला सर्व सांगितले आणि पपांची भूमिका निभावण्याचे कबूल केले. देशमुखांची आई जिवंत असल्याने देशमुखांची पत्नी मात्र वीणाला थोडीफार दूरच ठेवत राहिली. सासूला संशय येऊ नये म्हणून.'' तेव्हा साहजिकच वीणाच्या तोंडून पपा अशी हाक येते.

कृष्णाजी गाडगीळ म्हणजे केजी नगरपालिकेत अकाऊंटस खात्यात कामाला होते. परळच्या भर वस्तीतले त्यांचे घर आता पडझडीमुळे दयनीय झालेले. दुरुस्तीची ऐपत नाही; विकताही येत नाही अशा त्या घराजवळ पंकज हा सिंधी मुलगा, ''कोई भी चीज आठ आठ आना. रुपये का दो उठाव, जर्मन कंपनी का दिवाला'' ओरडत माल विकू लागतो. त्याच्या ओरडण्याने केजींचे डोके उठते. त्याला तेथून हुसकावून लावण्यासाठी ते बायकोला सांगतात. पण बायको उलट त्याच्याकडूनच वस्तू खरेदी करते. त्या पोराला चहा देते; वेळीअवेळी त्याला हवे ते काम सांगते. एकदा अडचणीत पंकजचे पाचशे रुपये केजी वापरतात आणि पंकज जणू त्यांचा सावकार बनतो. या पंकजकडून मिळणाऱ्या मदतीने ते एकीकडे मिंधे होतात, दुसरीकडे त्याच्यावर जळफळत राहतात. केजींच्या आजारपणात तो तीन हजार रुपये खर्चासाठी देतो. केजी त्याला म्हणतात, ''तुझे पैसे मी परत करीन.'' तो म्हणतो, ''इस घर में हमने दूधभात खाया है, इधर हम कौनसा भी हिसाब रखना नही चाहते... बिझिनेस में कैसे भी कमाऊंगा. घर गया, मोटरगाडियाँ गयी, माँ गयी, बाप गया, तीन हजार की बात छोड दो.'' जातानाही तो केजींना असा ओशाळवाणा करून जातो. हे सर्व विलक्षण ओढाताणीचे नाते 'पराधीन आहे जगती' या कथेत उलगडत जाते.

कॉलेजातील कुमारची प्रेयसी असणारी पण लग्नाला नकार देणारी सरोज मुलांची खेळणी उत्पादित करणाऱ्या माधवरावांशी लग्न करते. लग्नानंतर तिची परिस्थिती जेमतेमच असते. पण कुमार मात्र आर्थिकदृष्ट्या चांगली प्रगती करतो. तो आपल्या श्रीमंतीच्या दिमाखाने सरोजला मिंधे करू पाहतो. भारी कपबशीचा सेट तिला भेट देतो. मुलाला खेळणी



आणून देतो. माधवरावांनाही तो पार्टनरशिपमध्ये खेळण्याचा स्टॉल काढण्याची ऑफर देतो. परंतु सरोज त्याला विरोध करते. ''वारंवार मदत करून आम्हाला लुळं करायचं आहे, तुला नकार देऊन मी फसले, मी दुःखी आहे, असे माझ्या तोंडून तुला ऐकायचं आहे? पण तसे शब्द येणार नाहीत. मला माझ्या आत्मबळाची कल्पना आहे. मी तिला बधणार नाही.'' तेव्हा कुमारला स्वतःचीच शरम वाटते. सरोज हे न फुटणारं खेळणं आहे, ते ज्याच्यावर पडतं ती वस्तू फुटते तसं आपण फुटतोय असं कुमारला वाटतं. सरोज त्याला आणखी पुढं सांगते, ''माणसं जोडायची आहेत मला. मात्र पैशाचा डाग लावून नाही, तर मायेचा!''


अशा व्यक्तींच्या आणि नात्याच्या संघर्षाचे क्षण वपु काळे यांना टिपावेसे वाटतात. एकेकाचा मान, अभिमान आणि स्वाभिमान, त्यावर होणारे आघात, दुसऱ्यावर इम्प्रेशन मारायचा व त्याला मिंधे करण्याचा अहंभाव आणि स्वभाव, यांचा वेगवेगळ्या कोनातून ते शोध घेतात. वपु फँटसीवजा भराऱ्यात रमतात; परंतु या संग्रहातल्या कथांत वास्तवातल्या व्यक्तीच त्यांच्या लेखनाचा विषय झालेल्या दिसतात. या सर्व व्यक्ती आपापल्या मूल्यांबाबत आग्रही आहेत. कणा असलेल्या आहेत. रोखठोक विचार करणाऱ्या आहेत. 'जलधारा' मधील नायिका मंदा नाईक पावसात नुकत्याच ओळख झालेल्या रमेश देशपांडेच्या फ्लॅटवर जाते. तो जरा कोपऱ्यावरून येतो असे सांगून तिला घरातली नवीकोरी साडी देऊन ओली साडी बदलून घ्या असे सुचवितो. तिच्या मनात काय विचार येतो तर, 'एवढा सरळ माणूस. असं गुपचूप काही करणार नाही. तो जरासा वाह्यात असेल. पण निर्भीड आहे. तो खरा पुरुष आहे. तसं काही वाटलं तर सरळ सरळ म्हणेल की-माझ्या मनातून तुम्हाला एक मिठी मारावीशी वाटतेय. होकार असेल तर सांगा. नकार असेल तर...'

हा मोकळेपणाही वपुंच्या व्यक्तींचा सच्चेपणा प्रकट करतो. तो वाचकांना आकृष्ट करून घेतो.

मोडेन पण वाकणार नाही

पृष्ठे १२८. सत्तर रुपये, ग्रंथजगतच्या सभासदास ५३ रुपये.

□




## वपुंच्या संसार कथा : समंजस, तडजोडवादी, सुखी जीवनसूत्र शोधू पाहणाऱ्या

## वपु ८५

व. पु. काळे यांच्या भातुकली, कर्मयोगी, अस्ताई, सबकॉशन्स लेव्हल आणि बॉनसाय या पाच कथांचा संग्रह वपु ८५ या नावाने प्रसिद्ध झाला. त्याची तिसरी आवृत्ती नुकतीच बाजारात आली आहे. प्रा. मधु जामकर यांनी आपली काही मार्मिक निरीक्षणे पत्ररूपाने नमूद केली आहेत. वपुंचे कथाकथन हे त्यांच्या कथेपेक्षा अधिक जवळचे वाटते. रसिकांशी कथनातून हृदयसंवाद साधला जातो, वपुंच्या कथा वाचताने ते प्रत्यक्षात कथा सांगत आहेत आणि आपण वाचत आहोत, असे वाटते. वपुंची कथा ही ऐकण्यासाठी असते. वाचण्यासाठी नसते, असे वपुंच्या कथांमध्ये कालानुरूप बदल होत गेले आहेत. मराठी कथेचे अनेक टप्पे त्यांच्या कथेत दिसतात. ''हरिभाऊ आपटे यांच्या मनोरंजन काळातील स्फुट गोष्ट, मनोरंजन काळातील पसरट कथा, किर्लोस्कर कालखंडातील व्यक्तिदर्शन आणि सत्यकथा कालखंडातील मनोविश्लेषण या सर्वांचे पडसाद वपुंच्या कथेत उमटतात. सत्यकथा ऐन जोमात असताना वपुंनी किर्लोस्कर संस्कृतीशी नाते जुळवले.'' असेही मधु जामकर सांगतात.

वपुंच्या कथा या संसारकथा आहेत. ना. सी. फडके आणि य. गो. जोशी यांच्या संसारकथांतील टिकाऊ घटक घेऊन वपुंची कथा अवतरते. वपुंच्या संसारकथेला फँटसीची किनार आहे. ही कथा संसारातील मानवी मने उकलून दाखवते. परंतु ती मनोविश्लेषणात्मक वा बोजड होत नाही, ती सोवळी होत नाही, पाल्हाळीक बनत नाही. ''ही कथा मध्यम वर्गीय असूनही चटकदार आहे, नाट्यपूर्ण आहे, तिचा आकर्षक आरंभ, परिणामकारक खटके, सुटसुटीत वाक्यरचना, भुरळ घालणारी आहे. ऐकताऐकता श्रोता रंगला पाहिजे, मधूनमधून तो हसला पाहिजे,'' अशी ही कथा तंत्रदृष्ट्या फडकेप्रणीत तर मंत्रदृष्ट्या आधुनिक आहे, असेही ते दाखवून देतात.

या सर्वच संसारकथा तडजोडवादी आहेत. ही तडजोड ढोंग म्हणून नसते, तर ती



समंजस जीवनसृष्टीतून आलेली असते. वास्तवाच्या कठोर मुशीतून सुवर्णाची झळाळी घेऊन आलेली असते.

वपुंची कथा, एकाच वेळी अनेकांना अंतर्मुख करते, बहिर्मुखतेकडून अंतर्मुखता देते, लोकरंजनातून वैचारिकतेकडे झुकते. श्रोतृवृंदात ती आकार घेते. नवे उन्मेष प्रकट करते. प्रा. मधु जामकर हे वपुंच्या कथेची जातकुळी शोधून तिची जी कुंडली मांडतात, ती बहुतांशी वास्तवाच्या कसोटीला उतरते.

वपुंच्या कथेचा आरंभ नाट्यपूर्ण असतो. आगामी संघर्षाशी थेट भिडणारा असतो. आता भातुकली या पहिल्याच कथेचा आरंभ बघा.

''राजा, तू आता पळ. माझा नवरा एवढ्यात येईल.''

शैलेश कोणत्याही क्षणी घरी परत येण्याची शक्यता होती. फ्लॅटला दरवाजा एकच. काही झालं तरी राजा आणि शैलेश समोरासमोर येता कामा नयेत. फ्लॅटच्या दरवाजावर शैलेशच्या नावाची पाटी आहे. म्हणजे हे घर शैलेशचं. बाकी सगळं परकं. तिऱ्हाईत. एकूण मामला रिस्कीच.

''मग नक्की जाऊ?''

''राजा, आपल्या दोघांचा खासगी संसार, तू किंवा मी मरेपर्यंत चालायला हवा असेल तर...''

''तू किंवा मी, याचा अर्थ?''

''चुकले बाबा. आपण दोघं एकदम जाणार. आपली चिताही एकच असणार. तोपर्यंत संसार करायचा की नाही?''

या आरंभीच्या संवादातूनच कथेतील नाट्यपूर्ण संघर्ष नेमका समोर येतो. आपणही वाचक म्हणून राजा-राणी-शैलेश यांच्या त्रिकोणी प्रेमात खेचले जातो.

''हजारो फाइल्सप्रमाणे बायकोसुद्धा एक फाईलच. सही केल्याप्रमाणे समागम. संवाद, चेष्टामस्करी, काही आठवणी, काही स्वप्नं, वगैरे काहीही नाही. ध्येय-ऑफिसातील वरची खुर्ची व बेदम पैसा मिळवणं'' अशा शब्दात नवऱ्याचं, शैलेशचं व्यक्तिमत्त्व उभं राहतं.

''रोमान्स इज ए वेस्ट ऑफ टाइम. करीअर इज समथींग. त्यात आव्हान आहे. ताजेपणा आहे. शृंगारात काय आहे? त्याच्याइतकं मोनोटोनस काहीच नाही. बायकोच्या शरीराचं कौतुक-लग्न केलं त्याच दिवशी पावती फाडली. वारंवार कौतुक कसं करणार?'' अशा बोल्ड विधानांमुळे कथा निवेदनात रंग भरत जाण्यात वपुंची चतुराई दिसते.

घरी एकाकी किती दिवस बसून राहणार? मग राणी शॉर्टहँड करून स्टेनोची नोकरी मिळवते. राजाशी तिची ओळख होते. जवळीक साधते.

राजापेक्षाही अधिक सुंदर, तल्लख असा उदय चिपलकट्टी तिला भेटतो. तो ग्लोबल

टेंडर्स भरणारा गडगंज श्रीमंत.

राणी त्यालाही राजाबद्दल सांगते. उदय म्हणतो, ''आय ॲम सॉरी. राजा कधीच भेटणार नाही.''

वाचकहो, राजा का भेटणार नाही, हे मी येथे सांगत नाही. कथेचे नाव भातुकली आहे, हे लक्षात घ्या. आणि तुम्हीच जरा डोके चालवा. वपुंच्या कथेच्या शेवटी अशी कलाटणी येते की ती जीवनविषयक एक नवे भान देऊन जाते.

'कर्मयोगी' या कथेत एक कर्तव्यनिष्ठ, प्रामाणिक पोलीस कमिशनर दिवेकर एक दंगल आटोक्यात आणण्याच्या कामामुळे आपल्या भावाच्या आजारपणात लक्ष देऊ शकत नाही ते आणि त्यात त्या भावाचा सेरेब्रेल हॅमरेजमुळे मृत्यू होतो. या दोन घटनांची सांगड मनात घातली गेल्याने त्यांचा मानसिक समतोल ढळतो. त्या दंगलीचा उद्रेक ज्याच्यामुळे उसळला त्या सुडक्याचा मृत्यू आणि आपला भाऊ यांच्यात ही सांगड का घातली गेली? तर मरताना गुंड सुडका त्यांना म्हणतो, ''दिवेकरसाब, गोली मत चलाव. मुझे तुम्हारा भाई समझो.'' पण दिवेकर त्या गुंडाला गोळी घालतातच. आता दिवेकर सुडक्याची आठवण झाली की घरातच कुठंतरी लपून बसतात. या व्याधीवर इलाज नाही असे दिवेकरांचा मुलगा वपुंना सांगतो.

व्याख्यानानिमित्त नागपूरला गेलेल्या वपुंचा मुक्काम ज्यांच्या घरी असतो त्या कार्लेकरांची बायको सांगते, ''संसार नोकरीसारखाच मी केला. पाच सहा डिपार्टमेंट माझ्या हाताखाली आहेत. हजबंड डिपार्टमेंट, किचन सेक्शन, रिलेटिव्हज ब्रँच, गेस्टस वेटिंग रूम, चिल्ड्रेन्स बोर्ड रूम, मित्रमैत्रिणींची कॉन्फरन्स रूम आणि बेडरूम म्हणजे रिटायरिंग रूम.'' या घराचे व्यवस्थापनाचे तंत्र मुळातूनच वाचायला हवे.

कुटुंबप्रमुख कार्लेकरही पोलिस अधिकारी म्हणून कर्तव्यदक्ष. ते फक्त एकाच गोष्टीबद्दल खंत व्यक्त करतात. एका मवाल्याला त्यांनी पकडले. पण त्याचे हात छाटू पाहणाऱ्या हवालदाराला तसे करण्यापासून परावृत्त केले. तो मवाली सुटून येतो आणि पुन्हा तलवारीने तीन जणांची अकारण हत्या करतो. ते तीन जीव वाचले असते–जर त्या दिवशी त्या मवाल्याला कायदा हातात घेऊन मारले असते तर!'' आणिही खंत त्यांना आहे.

या दोन कर्तव्यपरायण पोलिस अधिकाऱ्यांची हकीकत 'कर्मयोगी'ला कथारूप देण्याला असमर्थ ठरते; परंतु त्यांच्या भावनिक व कौटुंबिक संवेदनशीलतेची साक्ष पटवते.

अस्ताईमध्ये पत्नीच्या मृत्यूनंतरचे तीनचार दिवस कसे गेले ते देवलमास्तर आठवत आहेत. तिच्या स्वभावातले अनेकविध पैलू लक्षात येऊन सैरभैर होत आहेत.

अठरा वर्षात एकदाही न भांडणाऱ्या रोहित आणि रोहिणी या जोडप्याची समंजस जीवनशैली मानसोपचार तज्ज्ञ सातोस्कर यांचीही झोप उडवते. या जोडप्याला न भांडता जगण्याचे तंत्र कसे गवसले ते 'सबकॉन्शस लेव्हल'मध्ये येते. एका पार्टीत ओळख झालेल्या



या जोडप्याला तो सायकिॲट्रिस्ट म्हणून नव्हे तर मित्र म्हणून भेटून त्यांच्या भांडणरहित संसाराचे गुपित जाणून घेऊ पाहतो.

झाडांच्या सावलीत जेव्हा माणसं वाढतात तेव्हा ती झाडापेक्षा उंच होतात. माणसांच्या सावलीत जेव्हा झाडं वाढतात तेव्हा ती फक्त जगतात, वाढत नाहीत. फक्त दिसतात. वाढ खुंटलेली. बॉनसाय... हा विचार बॉनसायमध्ये आला आहे.

पृष्ठे ९३. साठ रुपये, ग्रंथजगतच्या सभासदास ४५ रुपये.

□

## 'लाइफ-स्टाईल'चा प्रकाशन समारंभ

### सुधीर गाडगीळ यांच्यामुळे मुलाखत आनंददायी : ठाकरे

''सुधीर गाडगीळ हे मुलाखत घेत असतील, तर आगळीच मजा येते. त्यांच्यात खवचटपणा असला तरी मनमोकळेपणा असल्याने मुलाखत आनंददायी ठरते.'' असे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी म्हटले.

सुधीर गाडगीळ यांनी विविध क्षेत्रांतील मराठी भाषक आणि बहुचर्चित व्यक्तींशी झालेल्या गप्पाटप्पांतून त्यांच्या व्यक्तिरेखा शब्दबद्ध केल्या आहेत. याविषयीच्या 'लाईफ-स्टाईल' या त्यांच्या पुस्तकाचे प्रकाशन श्री. ठाकरे यांच्या हस्ते झाले.

'मातोश्री'वर झालेल्या या छोटेखानी समारंभात श्री. ठाकरे यांनी सुधीर गाडगीळ यांच्या मुलाखत घेण्याच्या शैलीचे कौतुक केले आणि मिश्किल शैलीत पत्रकारितेला चिमटेही काढले.

सुधीर गाडगीळ यांना आणखी शुभेच्छा काय देणार, असा सवाल करून श्री. ठाकरे म्हणाले, ''आपल्या क्षेत्रात त्यांनी स्थान कमाविले आहे. त्यांचा स्वभाव मनमोकळा असल्यामुळे त्यांच्याशी चटकन संवाद साधला जातो. गाडगीळ मुलाखत घेणार असले की आम्हालाही बरे वाटते. खवचटपणा त्यांच्यात असला, तरी तो मनमोकळा खवचटपणा असतो, इतरांकडे फक्त खवचटपणाच असतो.''

'लाईफ-स्टाईल'मध्ये पंडित भीमसेन जोशी, शांता शेळके, गो. नी. दांडेकर, राजा गोसावी, बाबामहाराज सातारकर, शंतनुराव किर्लोस्कर, रामदास फुटाणे, अमीन सयानी, आर. के. लक्ष्मण, चितळे बंधू, गजाननराव वाटवे, शोभे डे, अनुप जलोटा आदी विविध क्षेत्रातील व्यक्तींची जीवनशैली चितारण्यात आली आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसने हे पुस्तक प्रकाशित केले आहे.




**भगवद्गीता म्हणजे**
**मानसशास्त्रावरचा**
**पहिला ग्रंथ**

# आपण सारे अर्जुन

हा संसार ही एक माया आहे, मृगजळ आहे; ईश्वरी लीला आहे हे सतत कळत नकळत मनावर बिंबवले गेल्याने कुठलाही भारतीय माणूस हा अखेर अध्यात्माकडे वळतो. जीवनात एकूण अनुभवही तसेच येत जातात. साठीनंतर व. पु. काळे यांनाही अध्यात्मचिंतनात गोडी वाटावी हे त्यामुळे स्वाभाविकच मानावे लागेल. जीवनातील विविध सुखसौंदर्याचा रसिकतेने आस्वाद घेणाऱ्या वपुंना पत्नीच्या निधनानंतर विरक्ती आणि वैराग्य यांची ओढ लागली. प्रकृती चिंतनशील आधीपासूनच होती, आता ती सौंदर्य व सुख यांच्याऐवजी मनःशांती आणि नियती यात अधिक रस घेऊ लागली.

'आपण सारे अर्जुन' हे त्यांचे पुस्तक ओशो रजनीश यांच्या गीतेवरच्या सव्वादोनशे कॅसेट्सच्या श्रवणाचे एक गोमटे फळ आहे. गीतेवर लिहिण्याची आपली पात्रता नाही असे वपुंना वाटते, परंतु आपल्या मर्यादित आयुष्याच्या आधारावर काही चिरंतन प्रश्नांची उत्तरे देण्याचे बळ ते ओशो रजनीशांच्या प्रभावाने दाखवत आहेत.

वपुंची अनेक निरीक्षणेही ओघाओघात येतात. हे मुक्त व स्वैर चिंतन आहे, त्यामुळे कुठेही कुठलाही विषय वा विधान येण्याला मोकळीक आहे. वाचकालाही मोठे अवधान ठेवावे लागते.

परमेश्वराची सर्वोच्च निर्मिती म्हणजे माणूस (पृष्ठ १)

कलाकृती निर्मात्यापेक्षा मोठी होऊ शकत नाही. माणूस समजून घ्यायचा असेल तर आहे त्यापेक्षा वेगळी उंची हवी. माणूस म्हणजे आपण स्वतः, अन्य कोणी दुसरा तिसरा नव्हे. (१)

यासारखी विधाने आपल्या अर्थगांभीर्याने लक्ष वेधून घेणारच.

पत्नी वसुंधरा हिला ब्रेन ट्युमर झाल्यावर आपल्या मनाचा पाचोळा झाला आणि मनाचे



कुरुक्षेत्र झाले. अर्जुनासारखी आपली स्थिती झालीय असे वपुंना वाटले.

अशा मनाच्या अवस्थेत असताना रजनीशांच्या कॅसेटस ऐकण्यात आल्या आणि कृष्ण या अद्भुत व्यक्तिमत्त्वाची ओळख झाली. महाभारताचीही ओळख झाली. माणूसही नव्यानं दिसला.

आपण सगळे अर्जुनाचे अनुयायी आहोत.

म्हणजे गोंधळलेले.

कायम गोंधळलेले.

नुसते गोंधळलेले नाही तर सुपर डीलक्स गोंधळलेले.

हे करू की ते करू? हे बरोबर की ते बरोबर?

पाप-पुण्य, नीती-अनीती, शुभ-अशुभ, चारित्र्य, समाज, संस्कार, रूढी, परंपरा, उपासतापास, व्रतवैकल्यं–

प्रत्येक माणूस म्हणजे महाभारतच. आपलं कुटुंब हाही महाभारताचाच भाग. मग त्यात कौरव कोण? पांडव कोण? कौरव किती? पांडव किती? अर्जुन म्हटलं की दुर्योधन आला.

कृष्णही आला. शौर्याची शर्यत, युद्धकौशल्य, मित्रपक्ष, शत्रूपक्ष, राजकीय मतभेद, रणांगण, सैन्य, लढाई, रक्तपात.

''हे असं का?'' या तीन शब्दांनी आपला अर्जुन झाला असं वपुंना वाटतं आणि कृष्णासारखा सारथी लाभला म्हणून वपुंना अर्जुन हा सर्वात भाग्यवान पुरुष वाटतो. (कर्ण हा त्यांना सर्वात अभागी पुरुष वाटतो. कारण सूर्यपुत्र असूनही तो आयुष्यभर आंधळ्या धृतराष्ट्राची आणि त्याच्या पुत्राची चाकरी करतो. (आजचे आय ए एस अधिकारी भ्रष्टाचार करणाऱ्या मंत्र्यांची चाकरी करतात– तेही त्याच पंथातले, असे वपु म्हणतात.)

महाभारत म्हणजे व्यवहारवाद आहे. रामायण म्हणजे आदर्शवाद.

अर्जुनाला युद्ध नवं नाही. युद्ध टाळावं अशाही मताचा तो नाही. लहानपणापासून त्याला योद्धा बनवण्याचं शिक्षण देण्यात आलं आहे.

गीतेतला, महाभारतातला अर्जुन आणि आपण किंवा भेटणारी प्रत्येक गोंधळलेली व्यक्ती यात फरक नाही असे वपुंना वाटते.

कृष्णावतार संपला, पण अर्जुनाचा वंश मात्र वाढतोच आहे. आपण सगळेच लोक थोड्याफार प्रमाणात संभ्रमातच वावरतो.

करू की नको या चक्रव्यूहात सापडलो रे सापडलो की कृष्णाचा शोध सुरू होतो. परमात्मा म्हणजे पूर्णत्व. तोच कृष्ण म्हणजे पूर्णत्वाप्रत नेणारी शिडी. उडी घेण्याचा क्षण म्हणजे संभ्रम समाप्ती.

वपुंना वाटतं की महाभारताचं खरं युद्ध अर्जुन आणि कृष्ण यांच्यातच झालं. (५६)

अर्जुन प्रश्न विचारतोय, ''ही सगळी माझीच माणसं. ह्यांना मी का मारू?'' युद्धातून पळून जाणं हा शॉर्टकट होता. मार्ग सरळ होता. पण कृष्णासारखा गुरू त्याला मिळाला. त्यानं सांगितलं, ''थांब. पळू नकोस बघ. युद्ध करावं असं मला वाटतं. त्यातून तुझं काय ते तू ठरव. तू सांगशील तिथं रथ नेण्याचं काम माझं. पण तू युद्ध कर. कर्तव्य म्हणून. मला शरण ये. अन्य चिंता करू नकोस.''

भगवद्गीता हा वपुंना मानसशास्त्रावरचा पहिला ग्रंथ वाटतो. (११२) अर्जुनाच्या सगळ्या शंका व्यावहारिक आणि त्याहीपेक्षा जास्त मानसिक पातळीवरच्या आहेत. माणसाच्या सगळ्या गरजा मानसिक पातळीवरच्याच असतात. मनाचं अस्तित्व संपलं की समस्या संपल्या.

अर्जुन अध्यात्माच्या पातळीवर गेलेला नाही म्हणून संदेह आहे.

अध्यात्म म्हणजे समस्या नाही. ते समाधान आहे. अध्यात्म म्हणजे अनुभव. तिथं 'मन' याला अस्तित्व नाही. (११४)

गीता हा अध्यात्मापेक्षाही मनःशास्त्रावरचा ग्रंथ आहे.

अर्जुनाला राज्य हवं आहे. सत्ता हवी आहे. पण हे सरळ सरळ मान्य करायचे धाडस नाही. कृष्ण गप्प बसणार नाही. तो अर्जुनाला कृष्णत्वाच्या म्हणजे पूर्णत्वाच्या पातळीवर नेतो.

पूर्णत्व-वैचारिक पातळीवरचे. पूर्णत्व ममत्वाच्या, अहंकारशून्य पातळीवरचे.

आणि शेवटी वपु सांगतात, ''कृष्ण आणि अर्जुन दूर ठेवू. आपण सगळे अर्जुन असलो तरीही प्रत्येक अर्जुनात कृष्ण आहे. त्याचं नाव श्रेयस. आपण त्याची गळचेपी करतो. प्रेयसला कृष्ण मानतो. त्याच क्षणी कृष्ण अंतर्धान पावतो. मागं उरतो अर्जुन. सीदन्ति मम गात्राणि म्हणणारा म्हणजे कोण? तर तुम्ही आणि मी.''


वपुंचं हे स्वैर चिंतन. त्यांच्या कथाकथनकाराच्या उपजत कौशल्याच्या सगळ्या हरकती घेऊन सजलेले आहे. त्यामुळेच ते छान वाटते. वाचता वाचता आपण त्यात हरवून जातो.

मला वाटते, वपुंनी आता कथाकथन थांबवावे. भगवी वस्त्रे धारण करावी आणि गीतेवर प्रवचने देत महाराष्ट्रदेशी भ्रमण करावे. त्यांच्यातल्या अर्जुनाला मग सगळीकडे आपले भाऊबंद भेटतील आणि कृष्णही कुठेतरी त्यांना भेटेल. तो त्यांना सध्या जाणवणाऱ्या 'रायटर्स ब्लॉक' मधून बाहेर काढून नव्या लेखनाला प्रवृत्त करील. लढाई नव्याने सुरू करायची मानसिक सिद्धता देईल.

आपण सारे अर्जुन, पृष्ठे १४०. सत्तर रुपये, ग्रंथजगतच्या सभासदास ५३ रुपये.

□





# फुले आणि काटे

## मालनगाथा : स्त्रीभावाची लयदार बोल कहाणी

कोणत्याही भाषेची समृद्धता, संपन्नता आणि तिचा जिवंतपणा तिच्या क्षेत्रात वावरणाऱ्या, वाढणाऱ्या आणि प्रत्यक्ष जीवनव्यवहारात 'दैनंदिन' भाषेचा दर्जा प्राप्त झालेल्या बोलीभाषांवर अवलंबून असतो. मराठी भाषा या अर्थानं अतिशय श्रीमंत भाषा ठरते. सळसळतं चैतन्य शब्दाशब्दांतून खेळवणाऱ्या मराठीच्या बोली अक्षरशः अनेक आहेत. या सर्व बोलींपाशी शब्दसंग्रह अफाट आणि प्रत्येकीपाशी स्वतःचीच खास सांगता येईल अशी मौखिक साहित्यसंपदा तर खूपच मोठी आहे. मराठीच्या समस्त बोलींमधलं, 'लोकसाहित्य' या पदाला पोहचलेलं; पण अजूनही मौखिकच असलेलं साहित्य 'लिखित' केलं तर मराठी भाषेची कुबेरी-समृद्धता तात्काळ लक्षात येण्यासासारखी आहे. लोकसाहित्याचा जन्म घामातून, शरीर वेदनेतून जसा होतो तसाच तो माणूस आणि निसर्ग, माणूस आणि त्याचा भोवताल यांच्यातील जिवंत नात्यातून होतो. अत्यंत कष्टाच्या आयुष्यसरणीतून साकार होणाऱ्या लोकसाहित्याचा अक्षरशः अजोड ठरावा असा आविष्कार म्हणजे स्त्रीमुखानं आपला अफाट संसार मांडणारी 'ओवी!' मराठीच्या बोलींमधली सारी भाषिक श्रीमंती, तिची उत्तुंगता, त्या त्या बोलीची झेप घेण्याची आंतरिक ऊर्जा आणि संपूर्ण जगण्याचा हजारमुखी पट क्षणकालात उलगडून दाखवण्याची तिची शक्ती आणि नजाकत ओव्यांमध्येच दिसते. ज्यांना गेल्या सात-आठशे वर्षातलं महाराष्ट्रीय ग्रामीण स्त्री-जीवन आणि त्यातील स्थित्यंतर, आशा-आकांक्षा, स्त्री-मानसिकता, नातेसंबंध स्वरूप समजून घ्यायचं असेल त्यांनी महाराष्ट्राच्या परसा-अंगणातल्या झाडाझुडपांना, ओसरी-पडवीतल्या वा स्वयंपाकघरातल्या (आज अडगळीत गेलेल्या) जात्यांना किंवा नदीतीरांना ते विचारावं. इंदिराबाईंनी आयुष्यभर हाच महाथोर छंद केला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात त्यांनी हजारो ओव्या जमवल्या. अनेकींनी त्यांना त्या लिहून, जमवूनही दिल्या. त्या जिथं जिथं राहिल्या, वावरल्या, चार-दोन दिवसांच्या मुक्कामाला गेल्या तिथून त्यांनी हे सारं ओवीमय लोकसंचित, लोकधन, स्त्रीधन अपार निगुतीनं वेचलं- गोळा केलं; आणि जगण्याच्या साऱ्या जीवघेण्या वेगात अन् कल्लोळात ते समंजसतेनं जपलं. या जपलेल्या बहुगुणी आणि बहुमोल शब्दसंपत्तीचं प्रत्यक्ष दर्शन म्हणजे इंदिराबाईंनी सिद्ध

केलेला ‘मालनगाथा’ हा ओवीसंग्रह आहे.

–प्रा. विजय तापस (इंदिरा संत यांची मालनगाथा लोकसत्ता, १६.६.९९)

**नवोदितपणाची छाप किती दिवस?**

नवोदितपणाचा छाप काही दिवस बरा वाटतो, पण नंतर मात्र या शिक्क्याची रुखरुख येऊ लागते. हा मुखवटा किती दिवस जपायचा? पण मित्रहो, वाङ्मय सेवेची उत्तुंग शिखरे गाठणाऱ्या प्रत्येक भाषाप्रभूला या प्रवेशद्वारातून जावेच लागले होते. नवोदितांच्या या मंडपातून जेव्हा आपल्या रसिल्या साहित्यकृती घेऊन साहित्याचे नवे मानदंड उभे रहातील, तेव्हाच अशा साहित्य संमेलनांचा उद्देश सफल झाला असे मी मानेन. अर्थात शारदेच्या मंदिरात घराणेशाहीला थारा नाही. त्या श्रेष्ठ पायरीपर्यंत पोचण्यासाठी नियमबद्ध मापदंडही नाहीत. नवोदितांना आपापल्या वाटा स्वतःच्या कष्टानेच शोधाव्या लागतील. मात्र आपल्या प्रतिभेच्या बळावर तुम्ही ताजे, रसरशीत, मानवी मनाचा तळ शोधणारे भरीव असे काही घेऊन आलात की, वाङ्मयप्रेमी रसिक तुम्हाला यशाच्या आणि कीर्तीच्या शिखराकडे घेऊन जातात. चारुता सागरांचा ‘नागीण’ हा कथासंग्रह आणि मेघना पेठेंचा ‘हंस अकेला’ हा कथासंग्रह, लक्ष्मण मानेंचा ‘उपरा’. आपल्या पहिल्यावहिल्या कलाकृतीद्वारे या साहित्यिकांनी आपली ठसठशीत मुद्रा उमटवली आहे. स्वतःची भाषा, अनुभवविश्व आणि विषयाची आणि आशयाची नेमकी मांडणी या बळावर तुम्ही नव्या गुढ्या उभारण्यामध्ये सहज कामयाब ठरू शकता. सागरी जीवनाची प्रत्ययकारी अनुभूती देणारी अनंत सामंत यांची ‘एम.टी. आयवा मारू’ ही कादंबरीही नव्या लेखकाची पहिलीच पण घसघशीत अशी यशसंपदा आहे.

दहा वर्षामागे नवोदितपणाचा मुखवटा मलाही असह्य होत होता. ‘पानिपत’च्या निमित्ताने मी ऐतिहासिक कादंबरीमध्ये स्वतःची वेगळी वाट शोधण्याचा प्रयत्न केला. आजवर मखमली माजघरांच्या वर्णनात अडकलेली ऐतिहासिक कादंबरी मी महायुद्धाच्या उघड्या रणांगणावर नेली. ऐतिहासिक कादंबरीकार केवळ स्वप्नरंजनात अडकतात, चालू वास्तवाचा ते शोध घेऊ शकत नाहीत अशी तक्रार नेहमीच केली जाते. टीकाकारांच्या या आक्षेपाला मी ‘झाडाझडती’ व ‘पांगिरा’ च्या निमित्ताने सडेतोड उत्तर दिले. मात्र टीकाकार किंवा तथाकथित समीक्षक मंडळी ही पृथ्वीतलावरची अतिशय चलाख व सावध मंडळी असतात. अनुल्लेखाने मारण्याचेही एक अस्त्र त्यांच्याकडे असते. मात्र टीकाकारांच्या टीकाटिप्पणींची पर्वा न करता नवोदितांनी आपली साहित्यसाधना अखंड चालू ठेवावी.

–विश्वास पाटील (नवोदित साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातून)

☐




◆ जुलै १९९९

◆ वर्ष तिसरे

◆ अंक सातवा


# मेहता मराठी ग्रंथजगत

## – अनुक्रमणिका


**संपादकीय** ........ २

**व. पु. काळे : मनोगत** ........ ६

**साहित्यवार्ता** ........ १०

**पुस्तक परिचय**

**वपु सांगे वडिलांची किर्ती** ........ २६

**फँटसी : एक प्रेयसी** ........ ३०

**चिअर्स** ........ ३३

**मोडेन पण वाकणार नाही** ........ ३६

**वपु ८५** ........ ४०

**आपण सारे अर्जुन** ........ ४४

**फुले आणि काटे** ........ ४७

**नवीन स्पर्धा** ........ २५

**स्पर्धा निकाल / मे ९९ / पुस्तकातील मित्र ओळखा** ........ ३२

**स्पर्धा निकाल / मे ९९ / बाल कुमार पुस्तके मासिके ओळखा** ........ २५



❑ संपादक
सुनील मेहता

❑ कार्यकारी संपादक
शंकर सारडा

❑ संपादन सहाय्य
सुनीता दांडेकर

❑ अंकाची किंमत १० रु.
वार्षिक वर्गणी ८० रु.

❑ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी

❑ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

***संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,*** मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे-३०.

***मांडणी-अक्षरजुळणी : मेहता पब्लिशिंग हाऊस,*** १२१६ सदाशिव पेठ, पुणे-३०. फॅक्स : ०२०-४४७५४६२


*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*